## ‘समस्येला मोठी करण्यापासून रोखणे हाच तिच्यावरील उपाय’



**नवी दिल्ली :** पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी विज्ञान भवनात आयोजित डिपॉझिटर्स फर्स्ट या कार्यक्रमात बोलताना देशातील कोणत्याही समस्या विक्राळ रूप धारण करण्यापासून रोखण्यासाठी त्याच्यावर उपाय हाच पर्याय आहे. अनेक दशकांपासून असलेल्या समस्या शोधून आमचे सरकार जनतेला दिलासा देत आहे, असे म्हटले. आतापर्यंत देशात कोणतीही बँक बुडाली तर लोकांजवळ पश्चातापाशिवाय काहीही नसायचे, परंतु आता त्यांना बँक बुडाली तरी पाच लाख रुपयांपर्यंतची रक्कम परत मिळेल. देशात वर्षानुवर्षे एक प्रवृत्ती होती की, ती समस्या टाळायची, पण आताचा भारत समस्या सोडवण्यावर भर देतो. समस्यांना टाळत नाही, असे म्हणत पंतप्रधान मोदींनी काँग्रेसवर टीका केली.

सोमवार, १३ डिसेंबर २०२१
◆ वर्ष १४ ◆ अंक १४६
www.ramprahar.com

# राम प्रहर

◆ पाने ६ ◆ किंमत ₹२ ◆ रायगड

अंतरंग
‘कोरोना काळात शिवसेनेच्या शाखा कुलूपबंद होत्या’/२
महडमध्ये मुंगूर मत्स्यपालनामुळे ‘पाताळगंगे’ची गटारगंगा/५
इंग्लंडला दुहेरी धक्का; आयसीसीची कारवाई/६

# मविआ सरकारचा महाढिसाळ कारभार

## म्हाडाची परीक्षा अचानक रद्द; विद्यार्थ्यांनी व्यक्त केला संताप

**मुंबई : प्रतिनिधी**

महाराष्ट्र गृहनिर्माण आणि क्षेत्र विकास प्राधिकरण (म्हाडा) मुंबईकडून विविध पदांच्या भरतीसाठी रविवारी (दि. १२) आयोजित केलेली परीक्षा रद्द करण्यात आली आहे. काही तांत्रिक कारणास्तव परीक्षा रद्द करण्यात आली असल्याची माहिती गृहनिर्माणमंत्री जितेंद्र आव्हाड यांनी रात्री उशिरा एका व्हिडीओद्वारे दिली, मात्र अचानक परीक्षा रद्द करण्यात आल्याने, तसेच रात्री उशिरा याची माहिती देण्यात आल्याने विद्यार्थ्यांनी संताप व्यक्त केला आहे.

राज्यातील विविध परीक्षांच्या आयोजनातील गोंधळाचे सत्र काही थांबताना दिसत नाही. आरोग्य विभागाच्या परीक्षांमधील गोंधळ संपतो न संपतो तोच आता म्हाडाच्या परीक्षेतील गोंधळ समोर आला आहे. गृहनिर्माणमंत्री जितेंद्र आव्हाड यांनी रात्री उशिरा ट्विटर, तसेच म्हाडाच्या वेबसाईटवर एक व्हिडीओ पोस्ट करीत म्हाडाच्या विविध पदांच्या भरतीसाठी रविवारी होणारी परीक्षा आता पुढील वर्षी होणार आहे, असे जाहीर केले. काही अपरिहार्य कारणामुळे आणि तांत्रिक अडचणीमुळे ही परीक्षा आणि त्यानंतर होणाऱ्या सर्व परीक्षा पुढे ढकलण्यात आल्या असून जानेवारीत घेतल्या जातील. विद्यार्थ्यांनी उद्या सकाळी घराबाहेर पडून केंद्रावर जाऊ नये, असे आव्हाड यांनी पोस्टमध्ये म्हटले.

या परीक्षेसाठी पश्चिम महाराष्ट्रातून शनिवारीच हजारो विद्यार्थी मुंबई, पुणे, बारामती आदी विविध केंद्रात पोहचले होते. त्यांना मध्यरात्रीच्या घोषणेमुळे निष्कारण त्रासाला सामोरे जावे लागले. ही घोषणा आधीच किमान शनिवारपर्यंत केली असती तर नाहक धावपळ, त्रास वाचला असता असे सांगत विद्यार्थ्यांनी संताप व्यक्त केला. यामुळे स्पर्धा परीक्षेतील महाविकास आघाडीची गोंधळाची परंपरा आजही कायम राहिली आहे.

दरम्यान, पेपरफुटीमुळे परीक्षा रद्द केल्याचे सांगण्यात येत असले, तरी विविध परीक्षांचे पेपर कसे काय फुटतात? सरकार यावर काही उपाययोजना करणार की नाही, असे सवाल विद्यार्थीवर्गातून उपस्थित केले जात आहेत.



> हे सरकार विद्यार्थ्यांच्या आयुष्याशी खेळ करीत आहे. परीक्षार्थी परीक्षेच्या तयारीत असताना आदल्या रात्री परीक्षा रद्द करण्याचे पाप सरकार करतेय. पूर्णपणे या सरकारने बट्ट्याबोळ केला आहे. याची जबाबदारी सरकारने घ्यायला हवी.
> –प्रवीण दरेकर, विधान परिषद विरोधी पक्षनेते

### पेपरफुटीची सीबीआय चौकशी झाली पाहिजे
### देवेंद्र फडणवीसांची मागणी

म्हाडाच्या परीक्षेतील गोंधळ समोर आल्यानंतर विधानसभा विरोधी पक्षनेते देवेंद्र फडणवीस यांनी राज्य सरकारला धारेवर धरले आहे. फडणवीस म्हणाले, परीक्षा जाहीर करायच्या आणि त्यानंतर पेपरफुटीने त्या रद्द करायच्या अशा प्रकारचा सातत्याने काळा कारभार चाललेला आहे. एक परीक्षा यांना धड घेता येत नाही. मागेदेखील आरोग्य विभागाच्या परीक्षा तीन–तीन वेळा रद्द करून पेपर फुटला आणि त्याची तारे मंत्रालयापर्यंत गेलेली आहेत. मोठा भ्रष्टाचार या परीक्षांमध्ये सुरू आहे. त्यामुळे सगळ्या पेपरफुटीची सीबीआय चौकशी झाली पाहिजे.

## पेपरफुटीच्या शक्यतेने परीक्षा रद्द करण्याचा निर्णय; मंत्री आव्हाडांचा दावा

**मुंबई** : म्हाडाच्या परीक्षा अचानक रद्द करण्यात आल्यानंतर याबाबतची सविस्तर भूमिका गृहनिर्माणमंत्री जितेंद्र आव्हाड यांनी पत्रकार परिषदेत मांडली. पेपरफुटीची शक्यता निर्माण झाल्याने हा निर्णय घेण्यात आल्याचा दावा त्यांनी या वेळी केला.

पेपरफुटीमुळे गोपनियतेचा भंग झाल्यानंतर लाखो मुलांवर अन्याय होऊ शकतो, अशी शंका व्यक्त केल्यानंतर म्हाडाच्या अधिकाऱ्यांनी बैठक घेऊन परीक्षा रद्द करण्याचा निर्णय घेतला. पेपर घेऊन नंतर कळले असते तर जगाला तोंड दाखवायला जागा राहिली नसती. पेपरफुटीच्या आधीच पोलिसांनी टोळीचे कारस्थान उघडकीस आणले हे बरे झाले, मात्र त्यातून होणाऱ्या गैरसोयीबद्दल मी विद्यार्थ्यांची माफी मागतो, असे मंत्री आव्हाड यांनी म्हटले आहे.

**काही जणांना अटक**

दरम्यान, याबाबत पुण्याचे पोलीस आयुक्त अमिताभ गुप्ता यांनी खुलासा केला आहे. गुप्ता यांनी म्हटलेय की, आज म्हाडाचा पेपर होणार होता. पेपर फुटल्याचा संशय आल्यानंतर हा पेपर रद्द करण्यात आला. ज्या जी. ए. सॉफ्टवेअर कंपनीचा डायरेक्टर प्रीतेश देशमुख व दोन एजंट हे रात्री विश्रांतवाडी परिसरामध्ये पेपर देण्यासाठी आले होते. तेव्हाच पुणे सायबर पोलिसांनी त्यांना ताब्यात घेतले आणि अटक केली. औरंगाबादमध्येही सहा जणांना अटक करण्यात आलीये. या प्रकरणी म्हाडाकडून फिर्याद दाखल करण्यात आली होती. त्यानुसार कारवाई केली गेली. अधिक तपास सुरू आहे.

## जे नियम एमआयएमसाठी होते तेच राहुल गांधींच्या सभेसाठी असतील

### परवानगी देण्यावरून गृहमंत्र्यांचे सूचक विधान

**मुंबई : प्रतिनिधी**

येत्या २८ डिसेंबरला काँग्रेसच्या स्थापना दिनी काँग्रेस नेते खासदार राहुल गांधी मुंबईतील शिवाजी पार्क येथे सभा घेणार आहेत. ओमायक्रॉनच्या पार्श्वभूमीवर राज्य सरकारने एमआयएमच्या सभेला परवानगी नाकारली होती. त्यामुळे आता राहुल गांधींच्या सभेला परवानगी मिळणार का, असा प्रश्न आहे. अशातच राज्याचे गृहमंत्री दिलीप वळसे–पाटील यांनी सूचक विधान केले आहे.

एमआयएमचे खासदार असदुद्दीन ओवैसी यांची शनिवारी मुंबईत सभा झाली, तसेच एमआयएमकडून तिरंगा रॅली काढण्यात आली, पण त्याला राज्य सरकारने ओमायक्रॉनचे संकट आहे, असे सांगून परवानगी नाकारली होती. तरीही रॅली आणि सभा घेतल्याने काही जणांवर गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

आता राहुल गांधी यांच्या मुंबईतील सभेला परवानगी मिळणार का याबाबत गृहमंत्री दिलीप वळसे–पाटील म्हणाले की, एमआयएमच्या मुंबईतील सभेला परवानगी दिली नव्हती. जे नियम एमआयएमसाठी होते तेच नियम राहुल गांधी यांच्या सभेसाठी असतील. त्यामुळे राहुल गांधींच्या सभेला परवानगी मिळण्याची शक्यता कमी आहे.

### माथेरानमध्ये पर्यटक महिलेची शिरच्छेद करून निर्घृण हत्या

**कर्जत, नेरळ : बातमीदार**

माथेरानमध्ये पर्यटनास आलेल्या व्यक्तीकडून त्याच्यासोबत असलेल्या महिलेचा शिरच्छेद करून तिचे शीर घेऊन तो पसार झाला आहे. या महिलेचे शीरविरहित प्रेत निर्वस्त्र अवस्थेत रविवारी (दि. १२) आढळून आल्याने खळबळ उडाली आहे.

या जोडीने लॉजमध्ये प्रवेश करताना अमजद खान आणि रुबिना बेन अशी नावे नोंदवली होती तसेच मोबाईल नंबर अयोग्य आहे. लॉजमधील स्वच्छता कर्मचाऱ्याला सकाळी महिलेचा मृतदेह पलंगाखाली दिसून आला. दरम्यान, हा मृतदेह एमजीएम रुग्णालयातील कोल्ड स्टोरेजमध्ये ठेवण्यात येणार आहे.

## एक्स्प्रेस वेवर खोपोलीजवळ बसच्या धडकेत तिघांचा मृत्यू

**खोपोली, खालापूर : प्रतिनिधी**

मुंबई–पुणे द्रुतगती मार्गावर खोपोलीजवळ काँक्रिटीकरणाचे काम करणाऱ्या मजुरांना रविवारी (दि. १२) मध्यरात्री खाजगी बसने चिरडल्याने दोन जणांचा जागीच, तर एकाचा रुग्णालयात नेताना मृत्यू झाला. अन्य दोघांची प्रकृती चिंताजनक असून त्यांना कामोठे एमजीएम रुग्णालयात दाखल करण्यात आले.

लोणावळा येथून लग्नकार्य उरकून बस मुंबईला जात असताना रविवारी मध्यरात्री १च्या सुमारास या बसने रस्त्यात काँक्रिटीकरण सुरू असलेल्या जागी सिमेंट बल्करला धडक दिली. त्याच वेळेस तेथे काम करणाऱ्या मजुरांनाही ठोकरले.

**दोन जण गंभीर**



या अपघातात निलेश दशरथ कांबळे (२८, खोपोली), जगदिश राज (५०, जम्मू–काश्मीर) व मोहम्मद बबलू (२८, बिहार) असे तीन जण ठार झाले. अपघातात एकूण चार वाहने बाधित झाल्याचे समजते. बसचालक व प्रवासीही किरकोळ जखमी झाले होते. त्यांना प्रथमोपचारानंतर पुढे पाठविण्यात आले.



पनवेल : जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेच्या खांदा कॉलनीमधील चांगू काना ठाकूर (सीकेटी) महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजना (एनएसएस) विभागाच्या स्वयंसेवक आणि कार्यक्रम अधिकारी यांनी महापालिकेच्या स्वच्छ सर्वेक्षण उपक्रमात सहभाग घेऊन श्रमदान केले. महापालिकेच्या वतीने सीकेटी महाविद्यालयाला स्वच्छतादूत पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले. याबद्दल संस्थेचे चेअरमन, माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी कौतुक केले. या वेळी प्राचार्य डॉ. एस. के. पाटील, मुख्य कार्यक्रम अधिकारी सूर्यकांत परकाळे, कार्यक्रम अधिकारी प्रा. गणेश साठे, सत्यजित कांबळे, सागर खैरनार, आकाश पाटील, अपूर्वा ढगे यांच्यासह विद्यार्थी उपस्थित होते.

पनवेल भाजपतर्फे
जनहितार्थ
माहितीसाठी



पनवेल महानगरपालिका हद्दीत
सोमवार, दि. १३ डिसेंबर २०२१ रोजी होणारे
कोरोना प्रतिबंधक लसीकरण
(सर्व केंद्रांवर ऑनलाइन व ऑफलाइन लसीकरण होईल)

कोविशिल्ड

सर्व केंद्रांवर पहिला व दुसरा डोस (वयोगट : १८ वर्षांवरील सर्व नागरिकांसाठी)

- १. यूपीएचसी–१, गावदेवी पाडा, पनवेल
- २. जुने ग्रामीण रुग्णालय, कोळीवाडा–उरण नाका, पनवेल
- ३. यूपीएचसी–३, नवीन पनवेल
- ४. यूपीएचसी–४, गुरुद्वारासमोर, कळंबोली
- ५. यूपीएचसी–५, डी–मार्टच्या मागे, सेक्टर १५, खारघर
- ६. यूपीएचसी–६, सुषमा पाटील विद्यालय, कामोठे

*सहा नागरी प्राथमिक आरोग्य केंद्रांवर (यूपीएचसी) परदेशी जाणाऱ्या नागरिकांसाठी दुसरा डोस उपलब्ध असेल.*

- ७. आरोग्य उपकेंद्र, कर्नाटक समाज हॉलजवळ, नवीन पनवेल, से.२
- ८. आरोग्य उपकेंद्र मनुस्मृती रोटरी क्लब, सेक्टर ३०, ओवे गाव, खारघर
- ९. ज्ञानसाधना केंद्र, सेक्टर ६, कामोठे
- १०. नॅशनल इन्स्टिट्यूट ऑफ पब्लिक हेल्थ ट्रेनिंग ॲण्ड रिसर्च सेंटर, से. १८, खांदा कॉलनी
- ११. टाटा ॲडव्हान्स सेंटर, खारघर
- १२. आरोग्य उपकेंद्र १, रोटरी कम्युनिटी सेंटर, सेंट जॉर्ज चर्चजवळ, नवीन पनवेल
- १३. आरोग्य उपकेंद्र, नावडे, कळंबोली (उपप्रभाग समिती कार्यालय, नावडे, जुना पुणे–मुंबई हायवे)
- १४. न्यू इंग्लिश स्कूल, कळंबोली
- १५. सेंट्रल रेल्वे, पनवेल

कोव्हॅक्सिन

सर्व केंद्रांवर पहिला व दुसरा डोस (वयोगट : १८ वर्षांवरील सर्व नागरिकांसाठी)

- १. आरोग्य उपकेंद्र काळभैरव मंगल कार्यालय, प्रभाग समिती ब कार्यालयाच्या बाजूला, कळंबोली
- २. नागरी प्राथमिक आरोग्य केंद्र ५, खारघर.

पनवेल ग्रामीण लसीकरण

- पडघे रा.जि.प. शाळा
- खिडूकपाडा रा.जि.प. शाळा
- खारघर गाव रा.जि.प. शाळा
- कोपरा समाज मंदिर
- काळुंद्रे रा.जि.प. शाळा
- घोट रा.जि.प. शाळा – (म्हात्रे पाडा/गोंधळी पाडा/मढवी पाडा/वाघाची वाडी)
- धामोळे पाडा रा.जि.प. शाळा
- खुटारी/एकटपाडा रा.जि.प. शाळा
- किरवली/आडीवली रा.जि.प. शाळा
- धरणा रा.जि.प. शाळा

### निवडक

**मुंबई, पुण्यानंतर नागपुरात आढळला ओमायक्रॉनचा रुग्ण**

**नागपूर** : राज्यात कोरोनाचा नवा विषाणू ओमायक्रॉन हळूहळू सर्वत्र पसरतोय. डोंबिवली, पुणे, पिंपरी–चिंचवड, मुंबईनंतर आता विदर्भात ओमायक्रॉनचा शिरकाव झाला आहे. नागपुरात ओमायक्रॉनचा पहिला रुग्ण आढळला आहे. नव्या विषाणूची लागण झालेला रुग्ण ४० वर्षांचा आहे. या रुग्णाला प्रवासाचा इतिहास असून ओमायक्रॉनचा सर्वाधिक धोका असलेल्या दक्षिण आफ्रिकेतून ही व्यक्ती प्रवास करून आली होती.

**राहुलजी हीच का तुमची धर्मनिरपेक्षता? –ओवैसी**

**हैदराबाद** : ‘आज सत्तेत हिंदुत्ववादी आहेत. ते हिंदू नाहीत. आता हिंदुंना सत्तेत आणायचे आहे,’ असे विधान काँग्रेस नेते राहुल गांधी यांनी केले आहे. त्यांच्या या विधानावर एमआयएमचे नेते असदुद्दीन ओवैसी यांनी पलटवार केला आहे. हीच का तुमची धर्मनिरपेक्षता? असा सवाल ओवैसी यांनी केला आहे.

## पनवेल मनपाच्या स्वच्छता मोहिमेत आदई तलाव परिसर झाला चकाचक!

**पनवेल : प्रतिनिधी**

केंद्र शासनाच्या स्वच्छ भारत अभियानाच्या धर्तीवर पनवेल महापालिकेच्या वतीने आपल्या हद्दीत स्वच्छ सर्वेक्षण उपक्रम राबविण्यात येत आहे. या अनुषंगाने स्वच्छ पनवेल, सुंदर पनवेलसाठी प्रभाग समिती ब अंतर्गत प्रभाग क्रमांक १६मधील आदई तलाव येथे स्थायी समिती सभापती संतोष शेट्टी यांच्या माध्यमातून विशेष स्वच्छता मोहिमेचे आयोजन रविवारी (दि. १२) करण्यात आले होते. या मोहिमेत लोकप्रतिनिधी, विविध ३५ सामाजिक संघटनांचे कार्यकर्ते, तसेच महाविद्यालयीन विद्यार्थी व प्राध्यापक सहभागी झाले होते.

### लोकप्रतिनिधी, सामाजिक संघटना, विद्यार्थ्यांचा सहभाग

महापौर डॉ. कविता चौतमोल, सभागृह नेते परेश ठाकूर, आयुक्त गणेश देशमुख, स्थायी समिती सभापती संतोष शेट्टी, प्रभाग समिती ब सभापती समीर ठाकूर, नगरसेविका राजश्री वावेकर, माजी नगराध्यक्ष संदीप पाटील, उपायुक्त गणेश शेटे, सहाय्यक आयुक्त डॉ. वैभव विधाते, प्रभाग अधिकारी सदाशिव कवठे, स्वच्छ भारत अभियानच्या वरिष्ठ सल्लागार मधुप्रिया आवटे, कनिष्ठ सल्लागार सदाकत अली अन्सारी, मुख्य आरोग्य निरीक्षक शैलेश गायकवाड, स्वच्छता निरीक्षक अजिंक्य हळदे, पर्यवेक्षक संतोष गायकवाड, संदीप कांबळे, साई गणेश इंटरप्रायझेसचे व्यवस्थापक राकेश भुजबळ, सुपरवायझर चिन्मय घरत या मोहिमेत सहभागी झाले होते. (पान २ वर..)

(छाया : लक्ष्मण ठाकूर)





## ‘त्या’ व्हिडीओत बिपीन रावत यांनी व्यक्त केला होता सैन्याप्रती अभिमान

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

हेलिकॉप्टर अपघातामध्ये भारताच्या तिन्ही सैन्य दलांचे प्रमुख (सीडीएस) जनरल बिपीन रावत व त्यांच्या पत्नी मधुलिका रावत यांच्यासह अन्य ११ जणांचा मृत्यू झाला. दरम्यान, रविवारी (दि. १२) नवी दिल्लीत केंद्रीय संरक्षणमंत्री राजनाथ सिंह यांच्या उपस्थित स्वर्णिम विजयपर्व कार्यक्रमात बिपीन रावत यांचे स्मरण करीत त्यांना आदरांजली वाहण्यात आली, तसेच रावत यांचा एक रेकॉर्डेड व्हिडीओ संदेश ऐकवण्यात आला. हा संदेश ऐकून अनेकांचे डोळे पाणावले.

हेलिकॉप्टर दुर्घटनेपूर्वी एक दिवस आधी हा व्हिडीओ रेकॉर्ड करण्यात आला होता. यात बिपीन रावत यांनी १९७१ युद्धाला ५० वर्षे पूर्ण होत असल्याने साजऱ्या करण्यात येणाऱ्या सुवर्ण महोत्सवानिमित्त सशस्त्र दलाला शुभेच्छा दिल्या तसेच या युद्धात शहीद झालेल्या जवानांना श्रद्धांजली अर्पण केली होती.

‘आपल्या वीर शहिदांच्या स्मरणार्थ स्थापन झालेल्या अमर जवान ज्योतीच्या छायेत विजयपर्व आयोजित केले जातेय ही भाग्याची गोष्ट आहे. आम्हाला आमच्या सैन्याचा अभिमान आहे. सर्वांनी हे विजयपर्व एकत्र साजरा करूयात,’ असे रावत म्हणाले होते.

# कोरोना काळात शिवसेनेच्या शाखा कुलूपबंद

## विरोधी पक्षनेते देवेंद्र फडणवीस यांचा घणाघात; स्व. गोपीनाथ मुंडेंना अभिवादन

**मुंबई : प्रतिनिधी**

कोरोना काळात शिवसेनेच्या अनेक शाखा कुलूपबंद होत्या, असा घणाघात विधान सभेचे विरोधी पक्षनेते आणि माजी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी शिवसेनेवर निशाणा साधला. ते भाजप नेते स्वर्गीय गोपीनाथ मुंडे यांच्या जयंतीनिमित्त कार्यक्रमात बोलत होते.

भाजप नेते स्वर्गीय गोपीनाथ मुंडे यांच्या जयंती निमित्ती कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. त्यावेळी देवेंद्र फडणवीसांनी राज्यातील सत्ताधारी महाविकास आघाडी सरकारवर जोरदार टीका केलीय. आताचे सरकार एकही नवीन काम करत नाही. आम्ही असतो तर मेट्रोचे काम पूर्ण झाले असते. कोरोना काळात शिवसेनेच्या अनेक शाखा कुलूपबंद होत्या. त्या वेळी भाजपचे कार्यकर्ता थांबला नाही. तो रस्त्यावर उतरून मदत करत होता, अशी टीका देवेंद्र फडणवीस यांनी केली आहे.



गोपीनाथ मुंडे हे गरिबांचे आणि वंचितांचे नेते होते. ओबीसींना आवाज आणि नेता मुंडे यांनी दिला. मोदींनी नेहमी गरिबांचा विचार केला, मात्र राज्य सरकार नुसते घोषणा करते. गोपाळ शेट्टी यांनी सरकारविरोधात लढा चालू केला तो आपण जिंकू.

ते पुढे म्हणाले की, आमचे नेते, लोकनेते स्व. गोपीनाथजी मुंडे यांच्या जयंतीनिमित्त विविध लाभार्थ्यांना प्रधानमंत्री जनआरोग्य योजना-आयुष्मान भारत आणि घरेलू कामगार कार्डचे वाटप केले. आमदार मनीषा चौधरी यांनी या कार्यक्रमाचे आयोजन केले होते.

जगाच्या पाठीवरची सर्वांत मोठी जनारोग्य योजना आयुष्मान भारत पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी सुरू केली. गोरगरिबांची आयुष्यभर सेवा करणारे स्व. गोपीनाथजी मुंडे यांच्या जन्मदिनी हा कार्यक्रम आयोजित केला, ही अतिशय समाधानाची बाब आहे. आज जनतेत राहणाऱ्या लोकप्रतिनिधींना त्रास देण्याचे काम महाविकास आघाडी सरकार करते आहे. पण काळजीचे कारण नाही. कारण जनता त्यांच्याच पाठीशी असते, जे जनतेत राहतात आणि सतत जनतेसाठी झटत राहतात. हे तर सर्वांनाच माहिती आहे की, कोरोनाच्या काळात जनतेसोबत त्यांच्या मदतीला आपलेच सारे कार्यकर्ते होते आणि अनेक शाखा मात्र बंद होत्या. दहिसर पूर्व येथे आयोजित या कार्यक्रमाला विधान परिषदेचे विरोधी पक्षनेते प्रवीण दरेकर, खासदार गोपाळ शेट्टी, योगेश सागर आदी उपस्थित होते.

दरम्यान, फडणवीस यांनी लोकनेते गोपीनाथ मुंडे यांच्या सोबतच्या आठवणींना उजाळा देत त्यांना अभिवादन केले.

# महाविकास आघाडी सरकारकडून विद्यार्थ्यांच्या आयुष्याशी खेळ -दरेकर

**मुंबई : प्रतिनिधी**

आरोग्य भरती घोटाळा, पेपरफुटीच्या प्रकरणांनी स्पर्धा परीक्षा देणारे विद्यार्थी हैराण असतानाच आता याचप्रकारचे आणखी एक ढिसाळ कारभाराचे उदाहरण समोर आले आहे. राज्यातील म्हाडाच्या परीक्षा ऐनवेळी रद्द करण्यात आल्या आहेत. गेल्या काही दिवसांपासून या प्रकारच्या ढिसाळ कारभारामुळे संतप्त असणारे विद्यार्थी आणखीनच क्रोधित झाले आहेत. या गैरकारभारावरून आता राज्यात महाविकास आघाडी सरकारवर टीका केली जातेय. याबाबत टीका करताना विधान



परिषदेचे विरोधी पक्षनेते प्रवीण दरेकर यांनी हे सरकार विद्यार्थ्यांच्या आयुष्याशी खेळ करत असल्याची जोरदार टीका केली आहे.

प्रवीण दरेकर म्हणाले की, हे सरकार विद्यार्थ्यांच्या आयुष्याशी खेळ करत आहे. परीक्षार्थी परीक्षेच्या तयारीत असताना आदल्या रात्री परीक्षा रद्द करण्याचे पाप हे सरकार करतेय. पूर्णपणे या सरकारने बट्ट्याबोळ केला आहे. आरोग्य सेवकांच्या बाबतीतही तेच झाले, एमपीएससीच्या बाबतीतही अशीच दुरवस्था झाली. सरकार कुठल्याही बाबतीत विद्यार्थ्यांच्या बाबतीत गंभीर नाहीये. या परीक्षेच्या माध्यमातून आपली लोकं घेणे, भ्रष्टाचार करणे, हे तर यात लपले नाही ना, असा संशय येत आहे. याची जबाबदारी सरकारने घ्यायला हवी. या प्रकरणी संबधित व्यक्तींनी प्रायश्चित घेतले पाहिजे, असे मत प्रवीण दरेकर यांनी मांडले आहे.

# पुनाडे शाळा डागडुजीच्या कामाचा शुभारंभ

**उरण : वार्ताहर**

**आमदार महेश बालदी यांचा निधी**

आमदार महेश बालदी यांच्या जिल्हा नियोजन फंडातून पुनाडे शाळेच्या डागडुजीसाठी पाच लाख रुपयांचा निधी मंजूर केला होता. त्याला प्रशासकीय मान्यता मिळाल्याने रविवारी (दि. १२) या शाळेच्या डागडुजीच्या कामाचे भूमिपूजन भाजप उरण तालुका अध्यक्ष रवी भोईर आणि महिला तालुकाध्यक्ष राणी म्हात्रे यांच्या हस्ते करण्यात आले.

या वेळी नगरसेवक राजेश ठाकूर, भाजप तालुका सरचिटणीस सुनील पाटील, उरण पूर्वविभाग अध्यक्ष शशी पाटील, उद्योजक सूरज म्हात्रे, कोप्रोली महिला गाव अध्यक्ष निशा म्हात्रे, पुनाडे गाव अध्यक्ष लवेश पाटील, बुथ अध्यक्ष संदेश पाटील, ज्येष्ठ कार्यकर्ते महादेव पाटील, राजेश म्हात्रे, मंगेश पाटील, शाळा कमिटी अध्यक्ष, शाळा शिक्षक वर्ग, ठेकेदार आदी उपस्थित होते.

पुनाडेत सुसज्ञ अशी शाळा व्हावी ही बाब भाजप पुनाडे बूथ अध्यक्ष संदेश पाटील तसेच ग्रामपंचायत सदस्यांनी आमदार महेश बालदी यांना सांगितली. यानंतर आमदार बालदी यांनी सततचा पाठपुरावा करून निधी मंजूर करून घेतला. त्यानुसार या कामाची प्रत्यक्ष सुरुवात होत आहे याचे समाधान वाटते, असे मत शाळेचे शिक्षक वर्ग अणि शाळा कमिटीने व्यक्त केले. यासोबत आमदार महेश बालदी व भाजप कमिटीचे आभार मानले.



# देवद-सुकापूर उड्डाणपूलाचे आज भूमिपूजन

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

भाजप उत्तर रायगड जिल्हा अध्यक्ष आमदार प्रशांत ठाकूर यांच्या प्रयत्न व पाठपुराव्यातून साकारल्या जात असलेल्या देवद-सुकापूर उड्डाणपूलाचे भूमिपूजन सोमवारी (दि. १३) करण्यात येणार आहे. नवीन पनवेल गणेश विसर्जन घाट येथे सकाळी १० वाजता आमदार प्रशांत ठाकूर यांच्या हस्ते कामाचा शुभारंभ होणार आहे.

या कार्यक्रमाला भाजप नेते, पदाधिकारी उपस्थित राहणार आहेत, अशी माहिती जि. प. सदस्य अमित जाधव आणि सुकापूर ग्रामपंचायतीच्या सदस्य प्राची जाधव यांनी दिली. या नव्याने होणाऱ्या उड्डाणपुलामुळे येथील नागरिकांना व वाहनचालकांना वाहतुकीसाठीचा मार्ग सुकर होणार आहे.



**कामोठे : संत वामनभाऊ व संत भगवानबाबा सेवा प्रतिष्ठान यांच्या वतीने लोकनेते स्व. गोपीनाथ मुंडे यांच्या जयंतीनिमित्त आयोजित कार्यक्रमात पनवेल महापालिकेचे सभागृह नेते परेश ठाकूर यांनी गोपीनाथ मुंडे यांना अभिवादन केले. या वेळी भाजप कामोठे मंडल अध्यक्ष रवींद्र जोशी, शरद जगताप, काकासाहेब कुत्तरवडे, नगरसेविका पुष्पा कुत्तरवडे, अनिल चव्हाण, अनंत वारे, किशोर कुंडे, विनोद खेडकर, अर्जुन मिसाळ आदी उपस्थित होते.**




**पनवेल : स्वच्छ भारत अभियानांतर्गत महापालिकेच्या वतीने आदई तलाव येथे राबविण्यात आलेल्या विशेष स्वच्छता मोहिमेत सीकेटी महाविद्यालयीन विद्यार्थी व प्राध्यापकांनी सहभाग घेतला होता. याबद्दल त्यांना सन्मानचिन्ह व प्रमाणपत्र असलेला स्वच्छतादूत पुरस्कार देऊन गौरविण्यात आले. या वेळी महापौर डॉ. कविता चौतमोल, सभागृह नेते परेश ठाकूर, आयुक्त गणेश देशमुख, स्थायी समिती सभापती संतोष शेट्टी, नगरसेवक, नगरसेविका आदी उपस्थित होते.**

# ड्रेनेजचे झाकण नव्याने बसविले

## नगरसेवक विक्रांत पाटील यांची तत्परता

**पनवेल : वार्ताहर**

पनवेलमधील टिळक रोडकडे जाणाऱ्या गोखले हॉलसमोरील रस्त्यावर धोकादायक असलेल्या ड्रेनेजचे झाकण नव्याने बसविण्यात आले आहे. नगरसेवक विक्रांत पाटील यांनी तत्परतेने पाठपुरावा करून हे काम केले आहे. त्याबद्दल नागरिकांनी त्यांचे आभार मानले.



पनवेलमधील गोखले हॉलसमोरच्या रस्त्यावरील असलेल्या नाल्यावरच्या ड्रेनेज झाकणाचे काम काही दिवसांपूर्वीच नगरसेवक विक्रांत पाटील यांनी करून घेतले होते, परंतु काही अवजड वाहने यावरून जाऊन ड्रेनेजचे झाकण तुटले होते. याबाबत परिसरातील जागरूक नागरिकांनी ही बाब नगरसेवक विक्रांत पाटील यांच्या निदर्शनास आणून दिली. लागलेच यावर उपाययोजना करीत कोणतीही दुर्घटना होऊ नये म्हणून खड्डा पडलेल्या जागेच्या भोवती ब्यारॅकेट लावण्यात आले. महापालिका अधिकाऱ्यांशी बोलून घेतले. त्यांनी कॉन्ट्रॅक्टरला दुसऱ्या दिवशी लगेच कामाला सुरुवात करून घेण्यास सांगितले आणि मजबूत काम करण्याचे निर्देश नगरसेवक विक्रांत पाटील यांनी दिले.

कॉन्ट्रॅक्टरने काँक्रीटचा मजबूत बेस देऊन त्यावर फ्रेम लावून घेतली. प्रभागातील नागरिकांच्या समस्या प्राधान्याने नगरसेवक विक्रांत पाटील सोडवतात. याबद्दल नागरिक समाधान व्यक्त करीत आहेत.

# साळोखं नीड येथील तरुणावर पोक्सो अंतर्गत गुन्हा दाखल

**कर्जत : बातमीदार**

कर्जत तालुक्यातील साळोख तर्फे नीड या गावातील एका तरुणाने १४ वर्षीय विद्यार्थिनीच्या शरीराला स्पर्श करून लज्जा निर्माण होईल असे कृत्य केले, तसेच मोबाईल भेट देण्याचा प्रयत्न केला. त्यानंतर त्या तरुणाने मोबाईल घेतला नाही तर तुझ्या आईला ठार करेन अशी धमकी दिली. याबाबत कर्जत पोलीस ठाण्यात बाललैंगिक अत्याचार संरक्षण अधिनियम अर्थात पोक्सोअंतर्गत गुन्हा दाखल केला आहे.

कर्जत पोलीस ठाणे हद्दीत बुधवारी (दि. ८) दुपारी २ वाजताच्या सुमारास मौजे साळोख तर्फे नीड गावातील १४ वर्षीय विद्यार्थिनी आपल्या मैत्रीणीच्या दुकानात वही आणण्याकरिता गेली होती, परंतु दुकान बंद असल्याने ती तिच्या घरी गेली.

वही घेऊन परत घरी येत असताना एका तरुणाने या विद्यार्थिनीला रस्त्यात गाठून तुझ्या मैत्रिणीच्या दुकानात मोबाइल ठेवला आहे. त्यानंतर ती विद्यार्थिनी त्या तरुणाच्या सांगण्यास कोणतेही उत्तर देत नाही म्हणून त्या तरुणाने विद्यार्थिनीला हात लावत लज्जा निर्माण होईल असे कृत्य केले. त्यावर तिने त्या तरुणाचा हात झटकून टाकला. त्या वेळी त्या तरुणाने विद्यार्थिनीला दुकानातील मोबाइल घेतला नाही, तर तुझ्या आईला मारीन अशी धमकी दिली.

याबाबत त्या विद्यार्थिनीच्या आईने कर्जत पोलीस ठाण्यात तक्रार नोंदविली. पोक्सो अंतर्गत गुन्ह्याचा तपास महिला सहायक पोलीस निरीक्षक अथने करीत आहेत.

# खारघरमध्ये घनकचरा व्यवस्थापन जनजागृती

**पनवेल : प्रतिनिधी**

पनवेल महापालिका हद्दीत स्वच्छ भारत अभियानांतर्गत स्वच्छता अभियान राबविण्यात येत आहे. त्याअंतर्गत स्वच्छ सर्वेक्षण २०२२च्या धर्तीवर घनकचरा व्यवस्थापन जनजागृतीपर कार्यशाळा रविवारी (दि. १२) रोजी खारघर येथील हाईड पार्क घेण्यात आली.

या वेळी मार्गदर्शन करताना कचरा निर्मितीच्या जागीच कचऱ्याचे वर्गीकरण होऊन कचऱ्यावर प्रक्रिया करणेही तितकेच महत्त्वाचे आहे, असे पनवेल महानगरपालिका आयुक्त गणेश देशमुख यांनी सांगितले. दरम्यान, या वेळी भविष्यातील उपाययोजना व नागरिकांच्या शंकांचे निराकरण करण्यात केले.

या कार्यशाळेस उपायुक्त गणेश शेटे, सहायक आयुक्त वैभव विधाते, स्वच्छ भारत अभियान वरिष्ठ सल्लागार मधुप्रिया आवटे, प्रभाग अधिकारी जिंतेद्र मढवी व इतर पालिका कर्मचारी व खारघरमधील रहिवासी उपस्थित होते.




पान १ वरून

## पनवेल मनपाच्या विशेष मोहिमेत आदई तलाव परिसर झाला चकाचक!

या वेळी आदई तलाव व परिसरातून अंदाजे १० टन कचरा गोळा करण्यात आला. नागरिकांनी कचरा, निर्माल्य तलावात न टाकता येथे ठेवण्यात आलेल्या मोठ्या कलशांमध्ये टाकावा, जेणेकरून तलाव आणि परिसर स्वच्छ राहील, असा संदेश सर्व उपस्थितांनी दिला. महापालिकेच्या वतीने उपस्थित सर्व सामाजिक संस्था, महाविद्यालयांना सन्मानचिन्ह व प्रमाणपत्र असलेला स्वच्छतादूत पुरस्कार देऊन गौरविण्यात येऊन त्यांचे आभार मानण्यात आले.

# विहीघर-कोप्रोली रस्ता नव्याने करण्याची मागणी

**पुन्हा खड्डे पडल्याने वाहनचालकांना मनस्ताप**

**पनवेल : वार्ताहर**

सार्वजनिक बांधकाम विभागाच्या विहीघर-कोप्रोली, नेरे रस्त्यावर पुन्हा एकदा मोठ्या प्रमाणात खड्डे पडलेले दिसून येत आहेत. त्याचा मनस्ताप वाहनचालकांना होत आहे. त्यामुळे हा रस्ता नव्याने तयार करण्यात यावा, अशी मागणी नागरिकांसह भाजप कार्यकर्ते करीत आहेत.



पावसाळ्याच्या दिवसात पनवेल तालुक्यातील चिपळे -विहीघर, कोप्रोली-नेरे येथील सार्वजनिक बांधकाम विभागाच्या रस्त्यावर मोठमोठे खड्डे पडलेले होते. भाजप कार्यकर्त्यांनी याबाबत आवाज उठवला होता. त्यानंतर संबंधित ठेकेदाराने खड्डे बुजवले, मात्र निकृष्ट दर्जाचे साहित्य वापरल्याने थोड्याच दिवसात खडी उखडल्याने येथे पुन्हा खड्डे पडण्यास सुरुवात झाली. त्यामुळे या ठेकेदाराने खड्ड्यांवर थूकपट्टी लावल्याचा आरोप नागरिक करत आहेत. रस्त्यावर पडलेल्या खड्ड्यांमुळे अपघात होण्याची भीती व्यक्त केली जात आहे. खड्ड्यांमुळे वाहनांचेदेखील नुकसान होत आहे. लवकरात लवकर खड्डे बुजवून नवीन रस्ता तयार करावा, अशी मागणी नागरिकांसह भाजप कार्यकर्त्यांनी केली आहे.

# नवी मुंबई पालिकेतर्फे दिव्यांग विद्यार्थ्यांसाठी विविध उपक्रम

**नवी मुंबई : बातमीदार**

दिव्यांग सक्षमीकरणासाठी नवी मुंबई महानगरपालिकेच्या वतीने सर्व प्रकारच्या दिव्यांगांना एकाच छताखाली विविध प्रकारच्या शिक्षण, प्रशिक्षण व सेवासुविधा उपलब्ध करून देण्यात येत आहेत. नवी मुंबई महानगरपालिकेच्या शाळांमध्ये शिकणाऱ्या दिव्यांग मुलांकरिताही विविध उपक्रम राबविले जातात.

३ ते ९ डिसेंबरदरम्यान जागतिक समान संधी सप्ताहांतर्गत जगभरात दिव्यांगांकरिता विविध उपक्रम राबविण्यात आले. या अनुषंगाने दिव्यांग विद्यार्थ्यांच्या अंगभूत गुणांना वाव देण्याकरिता आयुक्त अभिजित बांगर यांच्या मार्गदर्शनाखाली समग्र शिक्षा समावेशित शिक्षण उपक्रमांतर्गत विविध उपक्रमांचे आयोजन



करण्यात आले होते. वाशी येथील विष्णुदास भावे नाट्यगृहात झालेल्या या कार्यक्रमामध्ये नवी मुंबई महापालिका क्षेत्रातील सर्व शाळांमधील दिव्यांग विद्यार्थी उत्साहाने सहभागी झाले होते. तसेच त्यांचे पालकही त्यांना प्रोत्साहित करण्यासाठी आवर्जून उपस्थित होते. वेशभूषा, नृत्य, चित्रकला, वक्तृत्व, गायन, खेळ अशा विविध उपक्रमांचे शिक्षण विभागाचे उपायुक्त जयदीप पवार यांच्या नियंत्रणाखाली स्पर्धात्मक आयोजन या वेळी करण्यात आले होते. या वेळी प्रशासन विभागाचे उपायुक्त दादासाहेब चाबुकस्वार, ठाणे जिल्हा डायटचे विभागप्रमुख दिनेश चौधरी व ठाणे जिल्हा समन्वयक कुऱ्हाडे उपस्थित होते. मान्यवरांनी दिव्यांग विद्यार्थ्यांमधील सुप्त गुणांचे कौतुक करीत या माध्यमातून त्यांच्या आंतरिक कलेला वाव मिळाल्याबद्दल आनंद व्यक्त केला.

यामध्ये नवी मुंबई महानगरपालिका क्षेत्रातील विविध शाळांमधील १८५ दिव्यांग विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला. विविध स्पर्धा उपक्रमांतील यशस्वी विद्यार्थ्यांना पारितोषिके प्रदान करून गौरविण्यात आले.


**दुखवटा**

## कृष्णाबाई चव्हाण



**माणगाव :** तालुक्यातील कोयना वसाहत खरवली फाटा येथील रहिवासी सामाजिक कार्यकर्ते सुरेश चव्हाण यांच्या मातोश्री कृष्णाबाई मारुतीराव चव्हाण (वय ९०) यांचे रविवारी (दि. ५) निधन झाले. त्यांच्या पश्चात तीन मुले, दोन मुली, नातवंडे असा परिवार आहे. कै. कृष्णाबाई चव्हाण यांचा दशक्रियाविधी मंगळवारी (दि. १४) तर उत्तरकार्यविधी गुरुवारी (दि. १६) कोयना वसाहत खरवली फाटा येथे होणार असल्याची माहिती त्यांच्या नातेवाईकांनी दिली.

## चंदूलाल शहा



**पाली :** सुधागड तालुक्यातील पालीतील गुजराती समाजातील ज्येष्ठ कार्यकर्ते चंदूलाल दलसुखदास शहा (वय ८७) यांचे नुकतेच निधन झाले. त्यांच्या पश्चात पत्नी, चार मुली व जावई, मुलगा व सून, नातवंडे, पतवंडे असा मोठा परिवार आहे. कै. चंदूलाल शहा यांनी पालीसारख्या ग्रामीण भागात एलआयसी पॉलिसी देत तब्बल ५८ वर्षे एलआयसी एजन्सी इनफोर्स चालवली. ५८ वर्षे विमा एजन्सी करणारे एलआयसी रोहा शाखेतील ते एकमेव विमा प्रतिनिधी होते. पालीतील गुजराती समाज व नवरात्र मंडळ स्थापना करण्यात भरीव योगदान केले. चंदूभाई या नावाने ते प्रसिद्ध होते.

# नवी मुंबईत कोरोना मृत्यूदर नियंत्रणात

**नवी मुंबई : रामप्रहर वृत्त**

नवी मुंबई महापालिका कार्यक्षेत्रात कोरोना मृत्यूचे प्रमाण नियंत्रणात ठेवण्यात आरोग्य विभागाला यश येऊ लागले आहे. डिसेंबर महिन्याच्या ११ दिवसांत फक्त एकाच रुग्णाचा मृत्यू झाला. नवी मुंबई महापालिकेने शून्य मृत्युदराचे उद्दिष्ट निश्चित करून कोरोनामुळे मृत्यू झाल्यास उपचारांमध्ये उणिवा राहिल्या का हेही तपासले जात आहे.

**११ दिवसांत एकच मृत्यू**

मृत्यू होण्याचे नक्की कारण काय, याविषयी तज्ज्ञांचे मत घेतले जात आहे. अनेक वेळा रुग्ण वेळेत उपचारासाठी दाखल न झाल्यामुळे मृत्यूचा धोका वाढल्याचेही निदर्शनास आले आहे. रुग्णास सहव्याधी असल्यास मृत्यूचा धोका वाढतो. मे महिन्यानंतर मृत्यूचे प्रमाण कमी होऊ लागले. सप्टेंबरपासून सरासरी एकपेक्षा कमी मृत्यूच्या घटना होऊ लागल्या आहेत. सप्टेंबरमध्ये २८, ऑक्टोबरमध्ये २३ नोव्हेंबरमध्ये १५ व डिसेंबरच्या पहिल्या ११ दिवसात फक्त एका रुग्णाचा मृत्यू झाला आहे.

पालिकेने केलेल्या उपाययोजना नागरिकांमध्ये निर्माण झालेली जागरूकता व रुग्णसंख्या कमी झाल्यामुळे मृत्यूचा आकडाही नियंत्रणात आल्याची माहिती वैद्यकीय तज्ज्ञांनी दिली. ओमायक्रॉनच्या पार्श्वभूमीवर चाचण्यांची संख्या वाढविली आहे. नियमांचे पालन न केल्यास पुन्हा रुग्णसंख्या वाढू शकते. त्यामुळे नागरिकांनी योग्य खबरदारी घेऊन रुग्णसंख्या व मृत्यूचे प्रमाण पुन्हा वाढणार याची दक्षता घ्यावी, असे आवाहन आरोग्य विभागाने केलेय.

## ओमायक्रॉनच्या पार्श्वभूमीवर दक्षता

**नवी मुंबई :** ओमायक्रॉनच्या पार्श्वभूमीवर खबरदारी घेण्याचे निर्देश यापूर्वीच महापालिका आयुक्त अभिजित बांगर यांनी आरोग्य विभागास दिलेले आहेत. टेस्टिंगमध्ये वाढ व लसीकरणाला गती अशा दोन्ही प्रकारे गतिमान कार्यवाही केली जात आहे. त्यामध्ये घणसोली व नोसीलनाका या दोन्ही नागरी आरोग्य केंद्राच्या वैद्यकीय अधिकाऱ्यांकडून याविषयीची माहिती आयुक्तांनी घेतली.

परदेशातून आलेला प्रवासी पॉझिटिव्ह आल्यास त्या ठिकाणी दक्षता घेण्यात यावी, असे निर्देशित करतानाच आयुक्तांनी परदेशातून आलेल्या कोरोना पॉझिटिव्ह व्यक्तीचा जोपर्यंत ओमायक्रॉन टेस्टिंग अहवाल येत नाही तोपर्यंत संशयित म्हणून शासकीय ट्रिटमेंट प्रोटोकॉल काळजीपूर्वक जपावा, असे आदेश आयुक्तांनी दिले. परदेशातून प्रवास करून आलेल्या कोणत्याही व्यक्तीस काही लक्षणे जाणवत असल्यास त्याला टेस्टिंगसाठी घराबाहेर न बोलावता त्याच्या घरी जाऊन संपूर्ण काळजी घेत त्याचा स्वॅब टेस्टिंगसाठी घ्यावा, असेही निर्देश आयुक्तांनी दिलेत.

# खारघर भाजपतर्फे नागरी समस्यांसंदर्भात बैठक



**खारघर : रामप्रहर वृत्त**

भाजप खारघर-तळोजा मंडलच्या वतीने प्रभाग ३च्या सेक्टर २७ ते ३६ मधील नागरिकांच्या मूलभूत समस्या निवारण्यासाठी, तसेच मालमत्ता करासंदर्भातील अडचणी समजून घेण्यासाठी रविवारी (दि. १२) बैठक आयोजित करण्यात आली होती.

रामशेठ ठाकूर कॉलेज ऑफ कॉमर्स अ‍ॅण्ड सायन्स या महाविद्यालयात झालेल्या बैठकीत उरण विधानसभा मतदारसंघाचे आमदार महेश बालदी, नगरसेवक हरेश केणी व सरचिटणीस कीर्ती नवघरे यांनी नागरिकांच्या समस्या समजून घेत त्यावर समाधानकारक मार्गदर्शन केले.

या वेळी मंडल अध्यक्ष ब्रिजेश पटेल, नगरसेवक अभिमन्यू पाटील, शत्रुघ्न काकडे, प्रवीण पाटील, सरचिटणीस दीपक शिंदे, अल्पसंख्याक सेल प्रदेश चिटणीस मन्सूर पटेल, युवा मोर्चाचे अध्यक्ष विनोद घरत, साजिद पटेल, प्रभाकर जोशी, जयदास तेलवणे, सचिन वासकर, सुमित सहाय असे अनेक कार्यकर्ते पदाधिकारी, तसेच विविध सोसायट्यांचे चेअरमन व सचिव उपस्थित होते.

# म्हाडाच्या परीक्षा रद्द झाल्याने भाजयुमोतर्फे आंदोलनाचा इशारा

**पनवेल : वार्ताहर**

म्हाडाच्या परीक्षा अचानकपणे रद्द झाल्याची माहिती रात्री उशिरा देण्यात आली. त्यामुळे परिक्षार्थी विद्यार्थ्यांना नाहक मनस्ताप देणाऱ्या या कृतीचा भारतीय जनता युवा मोर्चाच्या वतीने या गोष्टीचा तीव्र निषेध करीत प्रदेशाध्यक्ष विक्रांत पाटील यांनी राज्यव्यापी आंदोलनाचा इशारा दिला आहे.



राज्याचे गृहनिर्माणमंत्री जितेंद्र आव्हाड यांनी त्यांचे नेते शरद पवार यांच्या वाढदिवसानिमित्त विद्यार्थ्यांच्या आयुष्याचे वाटोळे करणारी भेट विद्यार्थ्यांना दिली आहे. विद्यार्थ्यांच्या आयुष्याची राखरांगोळी करण्याची एकही संधी राज्यातील हे करंटे सरकार सोडताना दिसत नाही, असा आरोप विक्रांत पाटील यांनी केला आहे.

विक्रांत पाटील पुढे म्हणाले की, हे सरकार उत्कृष्ट कामगिरी करत असेल तर फक्त खंडणी आणि दलाली वसुली मध्ये, बाकी विद्यार्थ्यांच्या सर्वच प्रश्नात अपयशी ठरलेले हे सरकार आहे. रविवारी (दि. १२) होणाऱ्या म्हाडाच्या परीक्षा रद्द करण्यात आल्याची माहिती गृहनिर्माण मंत्री रात्री २ वाजता केवळ एका व्हिडीओ बाईटच्या माध्यमातून देतात हे मोठे दुर्दैव आहे.

आरोग्य सेवक भरती परीक्षेतही चार वेळा असे प्रकार झाले, आता म्हाडाच्या परीक्षांमध्ये सुद्धा तोच प्रकार! हे सरकार जनसामान्यांचे नाही, तर दलालांचे सरकार आहे या गोष्टीवर पुन्हा एकदा शिक्कामोर्तब झालेला आहे. या सर्व परीक्षा एमपीएससी आयोगाच्या माध्यमातून घ्या, अशी मागणी विद्यार्थ्यांची असताना खाजगी कंपन्यांच्या माध्यमातून स्वतःचे आर्थिक हितसंबंध जपण्यासाठी सरकार हे रॅकेट चालवत असल्याचे दिसते.

## केवाळे-वाकडीत पुन्हा बिबट्याचे दर्शन

**पनवेल :** केवाळे-वाकडी परिसरात पुन्हा एकदा बिबट्या दिसल्याने परिसरात घबराट निर्माण झाली आहे. काही महिन्यांपूर्वी या परिसरात नागरिकांना बिबट्याचे दर्शन झाले होते. पुन्हा एकदा बिबट्या दिसल्याने नागरिक भयभीत झाले आहेत.

केवाळे-वाकडी परिसरात एका फार्महाऊसमधील काम करणाऱ्या मजुराला रात्री कुत्र्यांच्या ओरडण्याने त्याला जाग आली. तेव्हा त्याला फार्महाऊसमध्ये दोन बिबटे दिसले. या वेळी तो घाबरून घरातच लपून बसला. काही वेळाने ते बिबटे निघून गेले असल्याची माहिती या मजुराने दिली. बिबट्या दिसल्याची माहिती वनविभागाला देण्यात आली. त्यांनी परिसर पिंजून काढला, मात्र बिबट्या हाती लागला नाही. या बिबट्यांना जेरबंद करण्याची मागणी केली जात आहे.

# कळंबोलीतील नेत्रचिकित्सा शिबिरास उत्स्फूर्त प्रतिसाद

**कळंबोली : रामप्रहर वृत्त**

लोकनेते स्व. गोपीनाथ मुंडे यांच्या जयंतीनिमित्त कळंबोली येथील मध्यवर्ती कार्यालयामध्ये झालेल्या मोफत नेत्रचिकित्सा शिबिर व अल्पदरात चष्मे वाटप कार्यक्रमाचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला.



लोकनेते गोपीनाथ मुंडे यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. या वेळी कळंबोली शहर अध्यक्ष रविनाथ पाटील उपाध्यक्षा बायजा बबन बारगजे, सरचिटणीस दिलीप बिष्ट, भटके विमुक्त आघाडीचे अध्यक्ष आबा घुटुकडे, बंजारा परिषदेचे प्रवक्ते मधुकर जाटोत, केशव यादव, रामदास महानवर, देविदास खेडकर, उपाध्यक्ष संतोष गायकवाड, नगरसेवक कमल कोठारी, दत्तात्रय भिसे, संदीप भगत, बालाजी दौंड, रवींद्र जाधव, कार्यालयीन चिटणीस जगदीश खंडेलवाल आदी उपस्थित होते.

## पनवेलमध्ये तीन ग्रामपंचायतींमध्ये पोटनिवडणूक; दोन बिनविरोध

**पनवेल : वार्ताहर**

पनवेलमध्ये पाच ग्रामपंचायतमध्ये २१ डिसेंबर रोजी पोटनिवडणुका पार पडत आहेत. यातील दोन ग्रामपंचायतींच्या पोटनिवडणुका बिनविरोध झाल्या आहेत. त्यामुळे २१ डिसेंबरला ३ ग्रामपंचायतींमध्ये पोटनिवडणूक रंगणार आहे. २२ डिसेंबर रोजी मतमोजणी आहे.

पनवेलमध्ये निवडणुकीचे वारे वाहू लागलेले आहेत. काही महिन्यात जिल्हा परिषद, पनवेल पंचायत समिती आणि पनवेल महापालिकेच्या निवडणुका रंगणार आहेत. नुकत्याच ग्रामपंचायतच्या पोटनिवडणुका जाहीर झाल्या आहेत. गव्हाण ग्रामपंचायतच्या पोटनिवडणुकीसाठी एकही अर्ज प्राप्त झालेला नाही. तर पळस्पेमध्ये एक जागेसाठी एक अर्ज आल्याने ही जागा बिनविरोध निवडून आली आहे. त्यामुळे या ठिकाणी पोटनिवडणूक होणार नाही. कसळखंड, खानाव, जांभीवलीसाठी एकूण ६ अर्ज आले. खानाव आणि जांभीवलीमध्ये एक जागेसाठी निवडणूक होत आहे. कसळखंडसाठी दोन जागांसाठी निवडणूक होत आहे. यापैकी प्रभाग १ मध्ये एका जागेवर निवडणूक होणार असून दुसऱ्या जागेसाठी स्थगिती देण्यात आली आहे.

# नवी मुंबई पालिका अधिकारी, कर्मचाऱ्यांचे स्वेच्छेने रक्तदान

**नवी मुंबई : बातमीदार**

नवी मुंबई महापालिका अधिकारी, कर्मचारी यांच्यामधील इच्छुक रक्तदात्यांना रक्तदान करता यावे व या माध्यमातून महापालिकेच्या रक्तपेढीतील रक्तसाठ्यामध्ये वाढ व्हावी यादृष्टीने महापालिका मुख्यालयात रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. या शिबिरामध्ये १०४ रक्तदात्यांनी स्वेच्छेने रक्तदान केले. त्यामध्ये १० महिला कर्मचाऱ्यांनीही रक्तदान केले.

सर्वश्रेष्ठ रक्तदान करणाऱ्या या रक्तदात्यांना राज्य रक्त संक्रमण परिषद, महाराष्ट्र यांचे प्रशस्तिपत्र आणि सामायिक स्वैच्छिक रक्तदान कार्ड देण्यात आले. या कार्डद्वारे या रक्तदात्यांना महाराष्ट्रात कुठेही शासकीय रक्तपेढीमध्ये रक्ताची एक बॅग उपलब्ध होऊ शकते.

आरोग्य विभागामार्फत महापालिका मुख्यालयात आयोजित करण्यात आलेल्या या रक्तदान शिबिरासाठी अतिरिक्त आयुक्त संजय काकडे यांच्या नियंत्रणाखाली वैद्यकीय आरोग्य अधिकारी डॉ. प्रमोद पाटील, वाशी रुग्णालयाचे वैद्यकीय अधीक्षक डॉ. प्रशांत जवादे, रक्त संक्रमण अधिकारी डॉ. प्रीती संघानी यांनी महत्त्वाची भूमिका बजावली.

कोरोना काळात रक्तदानाची शिबिरे आयोजित करण्यावर मर्यादा आली त्यामुळे रक्ताची कमतरता भासत आहे. पालिकेच्या वतीने त्यावरही मात करीत रक्तसाठा वाढविण्यावर भर दिला जात आहे. त्यामध्ये महापालिका अधिकारी, कर्मचारी यांनीही रक्तदानासाठी पुढाकार घेत समाजासमोर चांगला आदर्श ठेवला आहे. यापुढील काळात जागेच्या उपलब्धतेनुसार महापालिका विभाग कार्यालयांमध्येही अशा प्रकारे रक्तदान शिबिरांचे आयोजन करण्यात येणार असून ज्या व्यक्ती, संस्था यांना आपल्या सोसायटी, संस्था यामध्ये रक्तदान शिबिरांचे आयोजन करावयाचे असेल त्यांनी आरोग्य विभागाशी संपर्क साधावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

# मजनू चित्रपटात पनवेलची स्वेतलाना नायिकेच्या भूमिकेत

**पनवेल : प्रतिनिधी**

सोनाई फिल्म क्रिएशनच्या मराठी मजनू या चित्रपटात पनवेलची स्वेतलाना नायिकेच्या भूमिकेत चमकणार आहे. पोस्टर प्रसिद्ध झाले असून लवकरच चित्रपट प्रेक्षकांच्या भेटीला येणार आहे. त्यामुळे पनवेलच्या सांस्कृतिक क्षेत्रात एक मानाचा तुरा खोवला जाणार आहे.



नवीन वर्षात एक हटके प्रेमकथा प्रेक्षकांच्या भेटीला येत असून सोनाई फिल्म क्रिएशनच्या मजनू या चित्रपटाद्वारे नवीन पनवेलमधील स्वेतलाना अहिरे ही नायिकेच्या भूमिकेत आपल्याला दिसणार आहे. नुकताच या चित्रपटाचा पोस्टर आणि मोशन पोस्टर प्रसिद्धीचा सोहळा दादर येथे झाला. या पोस्टरमध्ये नितीश चव्हाण हा रुबाबदारपणे घोड्यांच्यामध्ये धावत असून रोहन पाटील आणि स्वेतलाना एकमेकांसोबत दिसत आहेत. लक्षवेधी ठरलेल्या या पोस्टरमुळे या चित्रपटाबद्दल उत्सुकता निर्माण झाली आहे.

मजनूचे दिग्दर्शक शिवाजी दोलतांडे यांनी सांगितले की, हे एक ग्रामीणबाज असलेले निमशहरी भागातील कथानक असून हळूवार फुलणाऱ्या प्रेमकथेसोबत प्रेक्षकांना उत्कंठावर्धक सस्पेन्स पाहायला मिळणार आहे. या चित्रपटात स्वेतलाना सोबत 'लागीर झाल जी' फेम अभिनेता नितीश चव्हाण, रोहन पाटील, सुरेश विश्वकर्मा, मिलिंद शिंदे, अरबाज शेख, प्रणव रावराणे, आदिती सारंगधर, माधवी जुवेकर व भाकी चव्हाण यांच्या भूमिका आहेत. हा चित्रपट लवकरच संपूर्ण महाराष्ट्रात प्रदर्शित होणार आहे.

## गावठी हातभट्टीचा अड्डा उद्ध्वस्त

**मोहोपाडा : प्रतिनिधी**

रसायनी पोलीस ठाण्याच्या हद्दीतील वाशिवली डोंगराळ भागात बेकायदा गावठी दारूची हातभट्टी असल्याची माहिती रसायनी पोलिसांना मिळाली होती. त्यानुसार पोलिसांनी त्या ठिकाणी छापा टाकून बेकायदा गावठी हातभट्टीचा अड्डा उद्ध्वस्त केला आहे.

या कारवाईत बेवारस स्थितीत मिळून आलेले २०० लीटर क्षमतेची दोन पत्र्याच्या टाकीमध्ये तांबड्या रंगाचे उग्र वास येत असलेले एकूण २०० लीटर रसायन मिळून आले. हे रसायन जागीच ओतून नाश करून नष्ट करण्यात आले व पत्र्याची टाकी तोडून टाकण्यात आली.

गेल्या चार महिन्यांचा कालावधीत रसायनी परिसरात ही आठवी घटना असून वाशिवली डोंगराळ भागात बेकायदा हातभट्टीवर छापा टाकण्याची सहावी वेळ आहे.


सिडको
शहरांचे शिल्पकार

## जाहीर सूचना

**(वाटपपत्र/करारनामा करणेबाबत)**

सिडको महामंडळाच्या भूमी व भूमापन विभागातर्फे साडेबारा टक्के योजने अंतर्गत खालील तपशीलानुसार संबंधित भूधारकांना सदर भूखंडाचे वाटपपत्र/करारनामा करण्याची प्रशासकीय कार्यवाही करण्यात येत असून, खालील तपशीलानुसार संबंधितांना सदर भूखंडाचे वाटपपत्र करण्याचे प्रस्तावित आहे.

| अ. क्र. | गाव व संचिका क्र. | निवाडा क्र. | सर्व्हे क्र. | संपादित क्षेत्र | मंजूर पात्रता (चौ.मी.) | वाटपपत्र देण्यात येणाऱ्या भूखंडाची माहिती | भूखंडाच्या वाटपाशी संबंधित भूधारक व त्यांच्या कायदेशीर वारसांची माहिती | संचिकेतील उपलब्ध माहितीनुसार वाटपाशी संबंधित न्यायालयीन दाव्यांची माहिती व सद्यस्थिती |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | वडघर (संचिका क्र. १६) | २६/१०४ | ११७/५<br>११७/६<br>८२/१+२अ<br>८२/८<br>८८/७ | ०-२६-७<br>०-२१-८<br>०-११-०<br>०-०२-०<br>०-११-९ | ६५० चौ.मी. | मौजे - करंजाडे नोड, भूखंड क्र. ८१ सेक्टर - २A, क्षेत्र - ६४९.४४ चौ.मी. | मा. न्यायालयीन वारस दाखल्यानुसार(प्रोबेट) पात्र ठरलेले मूळ भूधारक देहुबाई रामचंद्र केणी यांचे वारस<br>१) श्री. लहू रामचंद्र केणी<br>२) श्री. अंकुश रामचंद्र केणी<br>३) श्री. पांडूरंग रामचंद्र केणी | निरंक |
| | | | एकूण संपादित क्षेत्र | ०-७३-४ | | | | |
| | | | | ता. पनवेल, जि. रायगड | | | | |
| २ | उलवे १९४३ | गव्हाण ४६२ | ९/७ | ०-०२-० | एकूण मंजूर पात्रता ४० चौ.मी. प्रस्तावित | भूखंड क्र. १८A सेक्टर - १८, क्षेत्र - ४० चौ.मी. | १. कै. महादेव बाळाराम कोळी (मयत) यांचे वारस<br>१. श्रीमती लक्ष्मीबाई महादेव कोळी<br>२. श्री. तेजस महादेव कोळी<br>३. श्री. विनायक महादेव कोळी<br>४. श्री. नितीन महादेव कोळी | |
| | | | एकूण | ०-०२-० | | | | |
| ३ | ३०२ कामोठे -२ | पनवेल ४२ | २५९/२ब पै | ०-६८-८ | ५९९.९५ चौ. मी. | मौजे पनवेल, भूखंड क्र. ४० सेक्टर-१९, क्षेत्र-५९९.९५ चौ. मी. | मूळ भूधारक<br>१) श्री. कमलाकांत उर्फ कमलाकर लक्ष्मण भगत<br>२) श्री. रमेश लक्ष्मण भगत<br>३) द्वारकानाथ लक्ष्मण भगत | निरंक |
| ४ | उलवे ८३८ | बंबावी ६(१) | २१/१<br>३२/५ | ०-२०-५<br>०-१०-४ | एकूण मंजूर पात्रता २५० चौ.मी. पैकी ५० चौ.मी. प्रस्तावित | भूखंड क्र. D-४ H, सेक्टर-८, क्षेत्र ५० चौ.मी. | १. चित्तरंजन कान्हा म्हात्रे | |
| ५ | उलवे ८३८ | १०(२) | ३२/६ | ०-०३-८ | ४० चौ.मी. | भूखंड क्र. १३९, सेक्टर-१९, क्षेत्र ४० चौ.मी. | १. चित्तरंजन कान्हा म्हात्रे | |
| | | | एकूण | ०-३४-७ | | | | |
| | | | | नोड - द्रोणागिरी | | | | |
| ६ | ७६७ | पागोटे ९४<br><br>पागोटे २९९ | ८८/५<br>३७/७अ<br>९६/२अ<br>१००/२<br>६८/३अ<br>५६/२<br>९७/३अ<br>११५/३<br>१२७/१३<br>२६/५ | ०-१३-४<br>०-०४-०<br>०-०३-६<br>०-२७-८<br>०-०४-३<br>०-०९-४<br>०-०१-८<br>०-१३-९<br>०-०९-०<br>०-०४-८ | ८०० चौ. मी. | द्रोणागिरी भूखंड क्र. ४९, सेक्टर४१, क्षेत्र - ७९९.८७ चौ.मी. | १) श्री. मनोहर दुकल्या बंडा<br>२) श्री. प्रकाश दुकल्या बंडा<br>३) श्री. राम दुकल्या बंडा<br>४) श्रीमती विजया मनोहर पाटील | निरंक |

उपरोक्त नमूद केलेल्या संचिकेसंदर्भात संबंधितांनी नोंद घ्यावी की, संबंधित संचिकेबाबत न्यायालयात त्यांचे हक्क प्रस्थापित करणारा दावा/हरकती प्रलंबित आहे, तसेच भूधारकाच्या नावाचा अथवा त्यांच्या कायदेशीर वारसाच्या नावाचा जाहीर सूचनेप्रमाणे प्रसिद्ध झालेल्या मजकूरात समावेश झालेला नसेल, अशा संबंधितांनी सदर जाहीर सूचना प्रसिद्ध झाल्यापासून ७ दिवसांच्या आत लेखी स्वरुपात अर्ज सादर करण्याच्या ठिकाणी अर्ज व पूरक कागदपत्रांसह निदर्शनास आणावी. सदर अर्जासह पूरक कागदपत्रांची तपासणी करुन पुढील योग्य कार्यवाही करण्यात येणार असून अपूर्ण माहितीसह कागदपत्रांच्या अर्जांची दखल घेतली जाणार नाही, याची संबंधितानी नोंद घ्यावी, ही विनंती.

अर्ज सादर करण्याचे ठिकाण :- **मुख्य भूमी व भूमापन अधिकारी (रायगड)**
**सिडको भवन, समस्या निवारण केंद्र, खिडकी क्र. १०, तळ मजला,**
**सी.बी.डी. बेलापूर, नवी मुंबई ४०० ६१४.**

**अति.मुख्य भूमी व भूमापन अधिकारी (रायगड)**

CIN - U99999 MH 1970 SGC-014574
www.cidco.maharashtra.gov.in
सिडको/जनसंपर्क/३३९/२०२१-२२

## संपादकीय

# सावध व्हा, सुरक्षित राहा!

देशात कोरोनाच्या दैनंदिन रुग्णसंख्येत दिवसेंदिवस घट होत असताना दुसरीकडे ओमायक्रॉन या नव्या विषाणूचे रुग्ण मात्र हळहळू वाढत आहेत. त्याची गती तीव्र नसली, तरी याच ओमायक्रॉनमुळे काही देशांमध्ये कोरोनाची नवी लाट आलेली आहे. म्हणूनच केंद्रीय यंत्रणेने देशातील नागरिकांना सावध करतानाच इशाराही दिला आहे.

**आतापर्यंत जगातील ५७ देशांमध्ये पोहचलेला कोरोनाचा नवा विषाणू ओमायक्रॉन हा अल्फा, डेल्टापेक्षा अधिक घातक असल्याचे सांगितले जात आहे. अतिशय वेगाने पसरणाऱ्या या नव्या विषाणूची ३०हून अधिक म्युटेशन आहेत, असेही जागतिक आरोग्य संघटनेने (डब्ल्यूएचओ) म्हटले आहे. अर्थात, तो किती परिणामकारक आहे याबद्दल गोंधळ कायम आहे. याआधी जेव्हा कोरोनाचा पहिल्यांदा प्रादूर्भाव झाला तेव्हाही कुणाला या महामारीबाबत नेमकेपणाने सांगता आले नव्हते, पण याच गडबडीत कोरोनाने अवघ्या जगाला कधी विळखा घातला हे कळलेदेखील नाही. हा हा म्हणता कोविड-१९ने अवघे जग आपल्या कवेत घेतले आणि होत्याचे नव्हते झाले. त्या कटू आठवणी ताज्याच आहेत. यंदाही वर्ष सरताना नव्या विषाणूने धास्ती निर्माण केली आहे. या विषाणूचा दक्षिण आफ्रिकेतील उगम आणि तिथून सर्वप्रथम तो जिथे आढळला अशा देशांमध्ये प्रवासी हवाई वाहतुकीस अनेक देशांनी बंदी घातली आहे. भारतानेही खबरदारी म्हणून नियमित हवाई वाहतूक ३१ डिसेंबरपर्यंत बंदच ठेवण्याचा निर्णय घेतला आहे. तरीदेखील ओमायक्रॉनबाधित रुग्ण अनेक ठिकाणी आढळत आहेत. आपल्या देशात कोविड-१९ विषाणूमुळे बाधित होणाऱ्या रुग्णांची संख्या कमी होत असताना मृत्यूचा आकडा त्या तुलनेत एमदम खाली उतरलेला नाहीए. अशात ओमायक्रॉन डोके वर काढू लागला आहे. सुरुवातीला ओमायक्रॉनचा संसर्ग झालेले दोन रुग्ण कर्नाटकमध्ये आढळले होते. त्यानंतर आता इतर ठिकाणीही या नव्या विषाणूने हात पाय पसरायला सुरुवात केली आहे, ज्यामुळे इतर ठिकाणीही अशा रुग्णांची नोंद होऊ लागली आहे. ही संख्या सध्या कमी वाटते, पण याच ओमायक्रॉनने ब्रिटन, फ्रान्समध्ये नव्या लाटेला निमंत्रण दिले आहे. या पार्श्वभूमीवर केंद्र सरकार सतर्क झाले असून शासकीय यंत्रणेकडून नवनव्या नियमावली लागू करण्यात येत आहेत. शासन-प्रशासन त्यांच्या बाजूने कार्यवाही करीतच आहे, पण नागरिकांनीही सामाजिक भान बाळगणे आवश्यक आहे. आपण पाहतो हल्ली कोरोनासंबंधी नियमांना सर्रास हरताळ फासला जात आहे. सार्वजनिक ठिकाणी मोठी गर्दी दिसून येते. मास्क बांधण्यासही कुचराई केली जाते. लसीकरणामुळे रुग्णसंख्या आटोक्यात आली असली, तरी अशा प्रकारे बेफिकीरपणे वागल्यास पुन्हा संकट येण्यास वेळ लागणार नाही. वेळ काही सांगून येत नाही हे दोनदा सर्वांनी अनुभवले आहे. तरीही अनेक जण सुधारायला तयार नाहीत. मास्क आणि लस दोन्ही आवश्यक आहेत. त्याचप्रमाणे सुरक्षित अंतर राखणेही काळाची गरज आहे. ओमायक्रॉनचा जागतिक पातळीवर वेगाने होणारा प्रसार चिंता वाढवणारा आहे. आपल्याकडेही तशी परिस्थिती उद्भवल्यास निर्बंध लागण्याची शक्यता नाकारता येत नाही. मग त्याचा त्रास सर्वांनाच होईल. तसे होऊ नये असे वाटत असल्यास स्वत: सावध होऊन सुरक्षित राहाणे आणि इतरांनाही सुरक्षितपणे जीवन जगू देणे सुज्ञपणाचे ठरेल.**

# मिनीट्रेन : माथेरानचे पर्यटन वाचविण्यासाठी

**खबरबात**
संतोष पेरणे





देश-विदेशी पर्यटकांची लाडकी समजल्या जाणाऱ्या मिनीट्रेनने शतक पूर्ण केले आहे. शतकोत्तर प्रवास करणाऱ्या मिनीट्रेनचा नॅरोगेज ट्रक या मिनीट्रेनचा पाया समजला जातो. हाच पाया आता आणखी मजबूत करण्याचा निर्णय मध्य रेल्वेने घेतला आहे.दरम्यान, मिनीट्रेनच्या २१ किलोमीटर लांबीच्या मार्गावर आता मजबूत समजले जाणारे सिमेंटच्या साहाय्याने बनलेले स्लीपर टाकले जाणार असून नॅरोगेज ट्रक मजबूत करून मध्य रेल्वे नेरळ-माथेरान-नेरळ मिनीट्रेनचा मार्ग सुरक्षित करण्याचा प्रयत्न करू पाहत आहे. गेली तीन वर्षे सुरक्षेच्या कारणास्तव बंद असलेल्या मिनीट्रेनचा मार्ग सुरक्षित करण्यासाठी मध्य रेल्वेने एक पाऊल पुढे टाकण्यास सुरुवात केली आहे. नेरळ-माथेरान या २१ किलोमीटर लोखंडी स्लीपर काढून त्या जागी सिमेंटचे स्लीपर लावण्याचे काम युद्धपातळीवर सुरू करण्यात आले आहे, मात्र हे काम घाटमार्गात असल्याने कर्मचाऱ्यांना अडचणींचा सामना करावा लागणार आहे.

महाराष्ट्रातील अबालवृद्धांची आवडती मिनीट्रेन ही काळानुरूप बदलत असताना दिसून येत आहे. सुरुवातीला कोळशाच्या इंधनावर चालणाऱ्या इंजिनामधून मिनीट्रेन येत होती, हे इंजिन १९८३ पर्यंत कार्यान्वित होते. त्यानंतर डिझेलवर चालणारे इंजिन या मार्गावर धावू लागले. या डिझेल इंजिनमध्ये अनेक बदल होत गेले. त्याचप्रमाणे स्लीपरमध्येही बदल होत आहेत. मिनीट्रेन सुरू झाली तेव्हापासून लाकडी स्लीपरचा उपयोग होत होता. ८० च्या दशकात लाकडी स्लीपर काढून त्याजागी लोखंडी स्लीपर वापरात आली. दरम्यान, पावसात अनेक ठिकाणी दरडी कोसळण्याच्या, रुळाखालाची जमीन वाहून जाण्याच्या, भूस्खलन होण्याच्या घटना मोठ्या प्रमाणात होऊ लागल्या. याच काळात मिनीट्रेन रुळावरून घसरण्याच्या घटना घडू लागल्या. त्यामुळे मध्य रेल्वेला सुरक्षेच्या कारणास्तव मिनीट्रेन बंद करावी लागली.

नेरळ-माथेरान-नेरळ हा नॅरोगेज ट्रॅक मुंबईतील मिल मालक आदमजी पीरभॉय कुटुंबाने बनवला. माथेरानला जाण्यासाठी नॅरोगेज ट्रॅक बनविल्यानंतर हा मार्ग त्यांनी भारतावर राज्य करणाऱ्या ब्रिटिशांकडे दिला. त्या मार्गावर ब्रिटिशांनी मिनीट्रेन सुरू केली आणि आज त्या मिनीट्रेनला शंभर वर्षे पूर्ण झाली आहेत. भारतीय रेल्वेच्या इतिहासातील सोनेरी क्षण समजला जात असून ब्रिटिश काळापासून या ठिकाणी मिनीट्रेन चालविली जात असून मागील काही वर्षात या ट्रेनच्या नॅरोगेज मार्गावर अनेक अडथळे येत आहेत. माथेरान येथील पर्जन्यमान लक्षात घेता दरवर्षी मिनीट्रेनच्या नॅरोगेज ट्रकच्या खालील माती वाहून जाण्याचे प्रकार घडत आहेत. त्यात मिनीट्रेनला सुरुवातीच्या काळात मातीचा भराव होता आणि त्याखाली लाकडी स्लीपर होते. कालांतराने त्या ठिकाणी खडी टाकून एक लोखंडी पट्टी असलेले स्लीपर २०००च्या दशकात टाकले गेले आणि त्या वेळी रूळ देखील बदलले गेले होते. असे अनेक उपाय करून देखील नेरळ-माथेरान मिनीट्रेनच्या ट्रॅकवर इंजिन रुळावरून घसरण्याचा समस्या सुटत नव्हत्या.

शेवटी भारताच्या इतर भागात ज्याप्रमाणे मध्य रेल्वेच्या बहुतेक सर्व ब्रॉडगेज मार्गांवर ज्याप्रमाणे लाकडी स्लीपर काढून सिमेंटचे स्लीपर बसवले गेले आहेत. त्यामुळे अपघाताचे प्रमाण देखील कमी झाले आहे. हे लक्षात घेऊन मध्य रेल्वेने नेरळ-माथेरान मिनीट्रेन मार्गावर सिमेंटचे स्लीपर बसविण्याचे धोरण हाती घेतले आहे. त्यासाठी खास वेगळ्या पद्धतीचे स्लीपर बनवले जात आहेत. कारण मिनीट्रेनचा ट्रक हा कमी रुंदीचा असल्याने ब्रॉडगेज मार्गावर रुळाखाली वापरले जाणारे मोठ्या स्लिपर बसविण्याची गरज नाही आणि म्हणून खास पाच फूट लांबी असलेले स्लिपर बनवले गेले आहेत. नेरळ येथे हे स्लीपर पोहचले असून मालवाहू गाडीच्या साहाय्याने ते स्लीपर नेरळपासून माथेरान नॅरोगेज मार्गावर टाकले जात आहेत. विशेष पद्धतीचे सिमेंट स्लीपर यांच्यामुळे नेरळ-माथेरान मिनीट्रेनचा नॅरोगेज मार्ग आणखी मजबूत आणि सुरक्षित होणार आहे. त्यामुळे पावसाळ्यात मिनीट्रेनच्या मार्गावर पावसाच्या पाण्याचा धोका निर्माण होणार नाही, अशी खात्री रेल्वेला आहे. हे स्लीपर सोलापूर आणि मध्य प्रदेश येथून बनवून आणण्यात आले आहेत.त्यासाठी तब्बल ३७५०० स्लीपर यांची गरज असून आतापर्यंत २००० स्लीपर आणण्यात आले आहेत. यासाठी काही कोटी खर्च अपेक्षित आहे. माथेरान मिनीट्रेन २१ किलोमीटर घाटमार्गावर लोखंडी स्लीपर काढून सिमेंटचे स्लीपर लावण्याचे काम सुरू झाले आहे. हे काम जोपर्यंत पूर्ण होत नाही तोपर्यंत मिनीट्रेन नेरळ-माथेरान मार्गावर अनिश्चित काळासाठी बंद राहणार आहे.

**माथेरानची निसर्गसंपदा...**

माथेरानमधील ४०० हेक्टरवरील माथेरान जंगल आणि माथेरानच्या माथ्यावरील ३०० हेक्टर वरील असे एकूण ७०० हेक्टरवर माथेरानचा अलौकिक ठेवा पसरलेला आहे. या निसर्गामुळेच माथेरानचे पर्यटन सतत बहरलेले असते. इतके वर्षे माथेरानकरांनी हा अनमोल ठेवा जपलेला आहे. यापुढे चांगल्या पद्धतीने जपायचा आहे. यासाठी समस्त माथेरानकरांकडून सहकार्य मिळवून या माथेरानचा निसर्ग अबाधित राखण्यासाठी प्रयत्न केले जाणार आहेत. यासाठी वेगवेगळ्या मार्गातून जनजागृती केली जात आहे.

माथेरान या नावातच समृद्ध जंगल अधोरेखित आहे. त्यामुळे इतर पर्यटनस्थळापेक्षा माथेरान हे अतिशय वेगळे पर्यटनस्थळ आहे. या जंगलातून चालणे याचा वेगळा अनुभव येथे आल्यावरच कळतो. येथील उंच झाडे ही फक्त माथेरानमध्येच दिसतात.त्यावर बागडणारे पक्षी, प्राणी यामुळे हे माथेरान आणखी खुलून दिसते, मात्र हे सर्व अबाधित राखण्यासाठी स्थानिकांसोबतच पर्यटकांनीही हे जंगल आपले समजून त्याची आपलेपणाने जोपासना करायला पाहिजे, वेळीच वनवणवे रोखले पाहिजेत, वृक्षलागवडीसोबतच वृक्ष संवर्धनसाठी पुढे आले पाहिजे, वन्य जीवांचे रक्षण, वनाचे महत्त्व, पशूपक्ष्यांचे महत्त्व याविषयी वनविभाग माथेरान व वनव्यवस्थापन समिती यांच्या मार्फत जनजागृती केली जात आहे. महत्त्वाचे म्हणजे आदिवासी वाड्यांमध्ये याची जनजागृती मोठ्या प्रमाणात केली जात आहे, असे वनपाल शंकर पवार यांनी सांगितले.

**वृक्षसंपदा...**

माथेरानमध्ये शेकडो वर्षांपासून असलेली हिरवीगार मोठमोठी वृक्षसंपदा हा माथेरानचा अलौकिक नैसर्गिक अनमोल ठेवा आहे. माथेरानच्या जंगलात जवळपास १५० प्रकारचे वृक्ष आढळतात. विविध जातीच्या वनस्पतीही आढळतात. हे जंगल सदाहरित व निमसदाहरित प्रकारात मोडले जाते. त्यामुळे जास्त पर्जन्यमानाला अनुकूल जांभूळ, पारजांभूळ, अंजन, पिसा, आंबा, उंबर, फणशी, बोकाडा, मळा, नांद्रुक, हिरडा, बेहडा, खैर, पांढरी इत्यादी झाडे दिसतात. याव्यतिरिक्त दिंडा, कारवी, नेचा या वनस्पती आढळतात.

# कर्जत लोकन्यायालयात ४४७ प्रलंबित दावे निकाली

## आजारी आणि ज्येष्ठ पक्षकारांचा व्हिडीओ कॉन्फरसिंगच्या माध्यमातून सहभाग

**कर्जत : प्रतिनिधी**



कर्जत तालुका न्यायाधिकरण समिती आणि कर्जत बार असोसिएशनकडून लोकन्यायालय आयोजित केले होते. कर्जत येथील न्यायालयात आयोजित करण्यात आलेल्या लोकशाही दिन कार्यक्रमात तब्बल ४४७ प्रलंबित दावे निकाली काढण्यात आले.

दरम्यान, कर्जत न्यायालयात अनेक वर्षे प्रलंबित असलेले दावे त्या दाव्यातील ज्येष्ठ पक्षकार आजारपणामुळे येऊ शकत नव्हते, अशा पक्षकारांना व्हिडीओ कॉन्फरसिंगच्या माध्यमातून सामील करून घेत त्यांच्या संमतीने काही दवे निकाली काढले.

कर्जत येथील न्यायालयात न्यायाधीश मनोद टोकले यांच्या पुढाकाराने लोकन्यायालय भरविण्यात आले होते. न्यायधीश तोकले यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या लोकन्यायालयात कर्जत बार असोसिएशनचे अध्यक्ष योगेश देशमुख, ज्येष्ठ वकील राजेंद्र निगुडकर आणि डिमेलो हे व्यासपीठावर उपस्थित होते. कर्जत न्यायालयात सेवा देणारे ४० हून अधिक वकील आपल्या पक्षकारांसह हजर होते. या लोकन्यायालयात कर्जत न्यायालयात प्रलंबित असलेले दिवाणी, सिव्हिल, क्रिमिनल, तसेच प्र-लिटिकेशन आदी प्रलंबित असलेल्या दाव्यांमधील पक्षकाराना निमंत्रित करण्यात आले होते.

लोकन्यायालयात सिव्हिल स्वरूपातील सहा; तर क्रिमिनल स्वरूपातील २३ दावे निकाली निघाले. त्याच वेळी न्यायालयात दावे सुरू असलेल्या २७९२ केसेस पैकी २२४ केसेसचे दावे निकाली काढण्यात या लोकन्यायालयाला यश आले.

प्र-लिटिकेशन असलेली २५८९ पैकी १९५ प्रकरणे दोन्ही पक्षकार यांच्या सामोपचारामुळे निकाली निघाली.

# शेतकऱ्यांनी हमीभाव खरेदी केंद्रात भात विक्री करण्याचे आवाहन

**पोलादपूर : प्रतिनिधी**

शासकीय आधारभूत किंमत हमीभाव योजनेंतर्गत पोलादपूरमधील शेतकऱ्यांनी तालुका शेतकरी सहकारी खरेदी विक्री संघ लि. या संस्थेमध्ये भातविक्री करून हमीभावाचा लाभ घ्यावा, असे आवाहन संस्थेचे चेअरमन मोहन शिंदे यांनी केले.

पोलादपूर तालुका शेतकरी सहकारी खरेदी विक्री संघातील आधारभूत भात खरेदी केंद्राचे उद्घाटन चेअरमन मोहन शिंदे यांच्या हस्ते करण्यात आले. खरेदी विक्री संघाचे व्हाईस चेअरमन अजित कंक, ज्येष्ठ संचालक ढवळे, संचालक गणेश उतेकर, संचालक मनोहर पार्टे, रामदास सकपाळ यांच्यासह तालुक्यातील शेतकरी या वेळी उपस्थित होते. संस्थेचे व्यवस्थापक विजय पवार यांनी कार्यक्रमाचे सूत्रसंचालन केले.

अ प्रतीच्या भातखरेदीसाठी प्रतीक्विंटल एक हजार ९६० आणि ब प्रतीच्या भातखरेदीसाठी प्रतीक्विंटल एक हजार ९४० रुपये हमीभाव देण्यात येणार असून तालुक्यातील शेतकऱ्यांनी खरेदी-विक्री संघातील हमीभाव भातखरेदी केंद्रामध्ये संपर्क साधण्याचे आवाहन या वेळी व्यवस्थापक विजय पवार यांनी केले.

(छाया : शैलेश पालकर)



# रोह्यातील मोरे महाविद्यालयाच्या विद्यार्थिनींचा क्षेत्रभेट उपक्रमात सहभाग

**रोहे : प्रतिनिधी**

एम. बी. मोरे फाउंडेशनच्या रोहे येथील महिला महाविद्यालयाच्या कला शाखेतील विद्यार्थिनींनी नुकताच मुरूड तालुक्यातील कोर्लई येथील प्रसिद्ध किल्ला, पुरातन चर्च, खोकरी येथील नबाबकालीन मकबरे यांना भेट दिली आणि आपल्या प्राध्यापकांकडून त्यांचा इतिहासदेखील समजून घेतला.

महिला महाविद्यालयात द्वितीय वर्ष वर्गातील विद्यार्थिनींसाठी शॉर्टटर्म सर्टिफिकेट कोर्स अंतर्गत तासिका, क्षेत्रभेट, प्रात्यक्षिके, प्रकल्प इ. अभ्यासक्रम घेतला जातो. त्याचाच एक भाग म्हणून द्वितीय वर्ष कला शाखेतील विद्यार्थिनींनी मुरूड येथील ऐतिहासिक वास्तूंना प्रत्यक्ष भेट दिली. महाविद्यालयाचे इतिहास विभाग प्रमुख प्रा. माधुरी जाधव व प्रा. दीपेश भोसले यांनी या भेटीत मुघलकालीन वास्तुकला व त्याबद्दलची माहिती विद्यार्थिनींना दिली. या वेळी महाविद्यालयाच्या प्रा. दर्शना शिंदे, प्रा. विवेका देशमुख, प्रा. हणमंत ढवळे, प्रा. हेमलता पाटील, शिक्षकेतर कर्मचारी पांडुरंग रटाटे, रवींद्र गुडेकर यांच्यासह ४३ विद्यार्थिनी उपस्थित होत्या. महाविद्यालयाचे प्राचार्य प्रसन्ना म्हसळकर आणि सर्टिफिकेट कोर्स समिती प्रमुख प्रा. प्रतीक्षा घारगे यांनी या क्षेत्रभेटीचे आयोजन केले होते.



(छाया : महादेव सरसंबे)

# कर्जतमधील शिबिरात ३८८ जणांचे लसीकरण

**कर्जत : प्रतिनिधी**

कर्जत नगर परिषद, लसीकरण संघर्ष समिती आणि उपजिल्हा रुग्णालय यांच्या संयुक्त विद्यमाने शुक्रवारी (दि. १०) शहरातील धापया मंदिर सभागृहात लसीकरण शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. या शिबिरात ३८८ जणांनी लसीकरण करून घेतले.

स्थानिक नगरसेविका मधुरा चंदन यांच्या हस्ते लसीकरण शिबिराचे उद्घाटन करण्यात आले. या वेळी महेंद्र चंदन यांच्यासह युवा फ्रेंड ग्रुपचे सभासद, माघी गणेशोत्सव मंडळाचे सदस्य आणि कर्जत लसीकरण संघर्ष समितीचे सदस्य उपस्थित होते.

कर्जत उपजिल्हा रुग्णालयाच्या डॉ. संगीता दळवी यांच्या मार्गदर्शनाखाली आरोग्य सेविका अश्विनी पाटील यांनी लसीकरण केले. त्यांना मंडळाचे महेश जाधव, गौरव ठोकळे, हेमंत पवार, संतोष पिंगळे, व्यंकटेश ठाकरे, पिंट्या भोईर, महेश सारडा, अक्षय गुप्ता, यश ठाकरे, मनोज वरसोलीकर यांनी सहकार्य केली. कोव्हॅक्सिन (८८) व कोविशिल्ड (३००) मिळून एकूण ३८८ जणांनी लसीचा पहिला व दुसरा डोस घेतला.



# महाडमध्ये दिव्यांगांना प्रमाणपत्रांचे वाटप

**महाड : प्रतिनिधी**

येथील श्री समर्थ दिव्यांग कल्याणकारी संस्थेच्या माध्यमातून महाड तालुक्यातील दिव्यांग व्यक्तींना नुकतेच दिव्यांग प्रमाणपत्रांचे वाटप करण्यात आले. दिव्यांग व्यक्तींनी या प्रमाणपत्राच्या आधारे शासकीय योजनेचा लाभ घेतला पाहिजे, असे प्रतिपादन महाराष्ट्र राज्य दिव्यांग कर्मचारी संघटनेचे अध्यक्ष साईनाथ पवार यांनी या वेळी केले.

भारत सरकारकडून देण्यात येणारे दिव्यांग प्रमाणपत्र दुर्गम, खेडोपाड्यातील दिव्यांग व्यक्तींना सहजरीत्या मिळावे, याकरिता श्री समर्थ दिव्यांग कल्याणकारी संस्थेने मंगळवारी (दि. ७) महाड पंचायत समितीच्या स्व. बाळासाहेब ठाकरे सभागृहामध्ये प्रमाणपत्र वाटप कार्यक्रमाचे आयोजन केले होते. या वेळी १०० हून अधिक दिव्यांग प्रमाणपत्रांचे वाटप करण्यात आले. शिवाय दिव्यांग व्यक्तींना त्यांच्या योजना आणि हक्क याबाबत पंचायत समिती आणि जिल्हा परिषदेच्या माध्यमातून मार्गदर्शनदेखील करण्यात आले.

जिप सदस्य मनोज काळीजकर, पंचायत समिती सभापती सिद्धी खांबे, माजी सभापती सपना मालुसरे, समाजकल्याण विभागाचे कनिष्ठ सहाय्यक राजू राठोड, संस्थेच्या अध्यक्षा दीप्ती शेडगे यांच्यासह दिव्यांग व्यक्ती या वेळी मोठ्या संख्येने उपस्थित होत्या. हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी संस्थेचे उपाध्यक्ष शैलेश बावळेकर, सचिव अनिल जाधव, खजिनदार मुबीन देशमुख यांनी विशेष प्रयत्न केले.

## स्कुटीला अपघात; एक ठार, दोघे जखमी

**खालापूर : प्रतिनिधी**

मुंबई-पुणे जुन्या महामार्गावर चौक फाटा येथील शिवमंदिरासमोर सायं ७ वा.च्या सुमारास अपघात घडला. एकाच स्कुटीवरून तीन तरुण चौककडे जात होते. चालकाचा ताबा सुटल्याने वामन मालुसरे (वाक्रुल, पेण) हा जागीच ठार झाला. तर महेश खांडेकर, सुनील पवार (दोघे रा. पेण) गंभीर जखमी झाले.

# महडमध्ये मुंगूर मत्स्यपालनामुळे
# पाताळगंगेची गटारगंगा

**खोपोली : प्रतिनिधी**

मुंगूर मत्स्यपालन तलावातील दुर्गंधीयुक्त पाणी थेट पाताळगंगा नदीत सोडण्यात येत असल्याने पाताळगंगा नदीपात्र दूषित झाले आहे. मुंगूरपालनावर बंदी असतानादेखील नगरपंचायत प्रशासनाच्या दुर्लक्षामुळे हे तलाव राजरोस मत्स्यपालन करत आहेत. त्याबाबत नागरिक संताप व्यक्त करत आहेत.



खालापूर नगरपंचायत हद्दीत महड येथे नदीकिनारी मोठ्या प्रमाणात बेकायदेशीरपणे मुंगूर मत्स्यपालन केले जाते. या ठिकाणी मोठ्या प्रमाणात तलाव आहेत. मुंगूर माशासाठी कोंबडीचे शिल्लक मांस व आतडी यांसारखे खाणे आणले जाते. अतिशय दुर्गंधीयुक्त खाणे तलावात टाकल्यामुळे पाण्यालासुद्धा घाण वास येतो. तलावातील पाणी काळसर गटारासारखे असून ठराविक दिवसांनी पाणी बदलताना तलावातील घाण पाणी थेट पाताळगंगा नदिपात्रात सोडले जाते. पाताळगंगा नदीवर कित्येक गावच्या पाणीयोजना कार्यान्वित

### प्रशासनाची डोळेझाक

आहेत. त्यामुळे तलावातून सोडण्यात येणाऱ्या पाण्यातून जंतूंचा शिरकाव होऊन आरोग्यास धोका निर्माण होण्याची भीती व्यक्त होत आहे. तलावातील नदीत सोडण्यात येणाच्या पाण्यामुळे परिसरातदेखील दुर्गंधी पसरत आहे. बेकायदेशीर चालणाऱ्या मुंगूर मत्स्यतलावाकडे नगरपंचायत प्रशासनाची होत असलेली डोळझाक म्हणजे नागरिकांच्या जीविताशी खेळ सुरू असून याबद्दल नागरिक संताप व्यक्त करीत आहेत.

> **पाताळगंगा नदीलगत हे तलाव असून मोठ्या प्रमाणात मुंगूर माशाची पैदास केली जाते. सडलेले खाद्य मुंगूर माशांना खायला दिले जाते. तलावातील घाण पाणी नदीपात्रात सोडले जात असल्याने पाताळगंगा प्रदूषित होत आहे.स्थानिक प्रशासन कारवाई करत नसल्याने जिल्हाधिकारी रायगड यांना निवेदन देत उपोषण करण्यात येईल.**
> **–निलेश जोगावडे, खालापूर**

# एसटी संपामुळे टपरीवाले, रसवंती चालक, दुकानदारांवर उपासमारीची वेळ

(छाया : धम्मशील सावंत)



**पाली : प्रतिनिधी**

एसटी ही सर्वसामान्य गोरगरीब जनतेची जीवनवाहिनी मानली जाते, रस्त्यावर सकाळ, दुपार, सायंकाळी व रात्री सामान्यांच्या सेवेत धावणारी एसटी आता नजरेस पडत नसल्याने अनेकांची गैरसोय होतेच याबरोबरच काहींना चुकल्यासारखे वाटत आहे.

मागील महिनाभरापासून एसटीचा संप सुरू आहे. परिणामी स्थानकात प्रवाशांची रेलचेल पूर्णपणे थांबली आहे. त्यामुळे स्थानकातील शेकडो फिरते विक्रेते, टपरीवाले, रसवंती चालक व दुकानदारांवर अक्षरशः उपासमारीची वेळ आली आहे. आधी लॉकडाऊन आणि आता एसटी कर्मचाऱ्यांचा संप अशा परिस्थितीत उदरनिर्वाह कसा चालवावा हा प्रश्न या सर्वांसमोर निर्माण झाला आहे.

पाली सुधागडसह जिल्ह्यात पनवेल, पेण, रामवाडी, अलिबाग, कर्जत, खोपोली, श्रीवर्धन, माणगाव, इंदापूर, पोलादपूर व महाड आदी बसस्थानकांवरून लांब पल्ल्याच्या एसटी बसेसची ये–जा असते. या बसस्थानकात येणारे बसमधील प्रवासी हेच या फिरते विक्रेते, छोटेमोठे हॉटेल चालक, भाजी विक्रेत्या, टपरीवाले व दुकानदारांचे हक्काचे ग्राहक असतात, मात्र स्थानकात बसच येत नाही म्हटल्यावर प्रवासी तरी कुठून येणार? परिणामी हे व्यवसायिक पुरते हतबल झाले आहेत.

> **वडिलांचे बसस्थानकात छोटे दुकान आहे. महिनाभरापासून एसटीचा संप असल्याने खूप नुकसान झाले आहे. दुकानाचे भाडेदेखील भरावे लागते. दुकान दिवसभर उघडे ठेवूनही ग्राहक फिरकत नाहीत. कारण स्थानकात कोणी येतच नाही. योग्य तोडगा निघून लवकर एसटीचा संप मिटला पाहिजे.**
> **–हेमंत राऊत, व्यवसायिक, पाली**

# मोरे महिला महाविद्यालयात डॉ. आंबेडकर महापरिनिर्वाण दिन

**रोहे : प्रतिनिधी**



एम. बी. मोरे फाऊंडेशन संचालित कला, वाणिज्य आणि विज्ञान महिला महाविद्यालयात कला शाखा व इतिहास विभागाच्या वतीने महामानव भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या महापरिनिर्वाण दिनानिमित्त अभिवादन करण्यात आले.

या कार्यक्रमामध्ये प्रथम वर्ष कला शाखेची विद्यार्थिनी आशा कुंटे हिने डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा जीवन परिचय व त्यांनी केलेल्या कार्याची माहिती दिली. इतिहास विभागप्रमुख प्रा. माधुरी जाधव यांनी बाबासाहेबांनी केलेले समाजिक, धार्मिक व शैक्षणिक कार्य, त्यांनी केलेला अभ्यास, यातून प्रेरणा घेऊन विद्यार्थिनींनी सुद्धा अभ्यास करावा, असे मत मांडले. महाविद्यालयाचे प्राचार्य प्रा. प्रसन्न म्हसळकर यांनी कोणत्याही परिस्थितीचा विचार न करता अभ्यासाकडे लक्ष केंद्रित करा, असे सांगितले. या वेळी प्रा. दर्शना शिंदे, प्रा. प्रणाली महाडिक, प्रा. हणमंत ढवळे उपस्थित होते. सूत्रसंचालन व आभार प्रा. दीपेश भोसले यांनी केले.



# मुंबई–पुणे महामार्गावर बर्निंग कारचा थरार

**खोपोली : प्रतिनिधी**

मुंबई–पुणे द्रुतगती महामार्गावर किमी ४१/६०० पुणेकडील दिशेच्या रस्त्यावर एम एच ०२–२६१९ या कारने अचानक पेट घेतल्याने कारला आग लागली. आग लागण्यापूर्वी कारमधील चार प्रवासी बाहेर पडल्याने सुदैवाने जीवितहानी झाली नाही, मात्र कारचा जळून कोळसा झाला आहे.

# पुणे येथील २०० महिलांना दुर्गराज प्रतिष्ठानने घडविले पद्मदुर्गचे दर्शन

**मुरूड : प्रतिनिधी**



मागील ३० वर्षांपासून दुर्ग संवर्धन व दुर्ग सहली घडविण्यात कार्यरत असलेल्या पुण्यातील कर्वेनगर येथील श्री दुर्गराज प्रतिष्ठानने २०० महिलांना मुरूड–जंजिरा येथील पद्मदुर्ग व अष्टविनायकातील पालीच्या गणपतीचे दर्शन घडविले. श्री दुर्गराज प्रतिष्ठान दरवर्षी गृहिणी तसेच नोकरी व्यवसायात व्यस्त असणाऱ्या महिला व विद्यार्थिनी यांच्यासाठी एक दुर्ग व त्या परिसरातील देवस्थान यांचे दर्शन घडविण्याचे कार्य करते.

संगणकीय युगात विद्यार्थ्यांना ऐतिहासिक गडकिल्ल्यांची माहिती व्हावी यासाठी आम्ही या सहलींचे आयोजन करीत असल्याचे प्रतिष्ठानचे सदस्य ललित गव्हाणे यांनी सांगितले. या सहलीचे आयोजन प्रतिष्ठानचे सदस्य ललित गव्हाणे, रूपेश सकपाळ, चेतन धाडवे, निखिल बलकवडे यांनी उत्कृष्ट प्रकारे केल्यामुळे व पद्मदुर्ग किल्ल्याचे व पालीच्या गणपतीचे दर्शन घडविल्याबद्दल व माहिती दिल्याबद्दल सहलीमध्ये सहभागी झालेल्या पुणे कर्वेनगर येथील नगरसेविका लक्ष्मीताई दुधाणे यांनी प्रतिष्ठानचे विशेष आभार मानले.

---

RNI No. MAHBIL/2009/36619

## महाराष्ट्र शासन राजपत्र
## असाधारण भाग एक-कोकण विभागीय पुरवणी

वर्ष ७, अंक ५३(४)] गुरुवार, नोव्हेंबर १८, २०२१/कार्तिक २७, शके १९४३ [पृष्ठे ३, किंमत : रुपये ११.००

**असाधारण क्रमांक ७३**

### प्राधिकृत प्रकाशन
### जिल्हाधिकारी व जिल्हादंडाधिकारी रायगड अलिबाग यांजकडून

क्र. भूसंपादन/टें ६/मौजे चेंढरे/१९ ची अधिसूचना/प्रसिद्धी/२०२१.–ज्याअर्थी, पोलीस अधीक्षक, रायगड अलिबाग यांचेमार्फत पोलीस दलातील नव्याने स्थापन झालेल्या जलद प्रतिसाद पथक, दंगा नियंत्रण पथक, पोलीस मोटारवाहन इत्यादी प्रयोजनाकरिता अलिबाग, ता. अलिबाग, जि. रायगड येथील जमीन संपादित करावयाची आहे. सदर संपादनासाठी केलेली जमीन उपविभागीय अधिकारी, अलिबाग, उपविभाग अलिबाग, ता. अलिबाग, जि. रायगड यांचे कार्यालयाकडून संपादनाची कार्यवाही सुरू करण्यात आली आहे;

आणि ज्याअर्थी, भूमिसंपादन, पुनर्वसन व पुनर्वसाहत करताना उचित भरपाई मिळण्याचा व पारदर्शकतेचा हक्क अधिनियम, २०१३ (२०१३ चा ३०) (यात यापुढे ज्याचा निर्देश ''उक्त अधिनियम'' असा केला आहे) यांच्या कलम ११ च्या पोट–कलम (१) द्वारे प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करून, उपविभागीय अधिकारी, अलिबाग यांनी अधिसूचना, क्रमांक उविअ/कात–२/भूसंपादन/ चेंढरे/एस आर १ वाढीव क्षेत्र/२०१५/२०२०, दि. २४ नोव्हेंबर २०२०, अन्वये कलम ११ ची अधिसूचना मराठीमध्ये **महाराष्ट्र शासन राजपत्र,** भाग एक–कोकण विभागीय पुरवणी, गुरूवार ते बुधवार, दि. ३–९ डिसेंबर २०२०, पृष्ठ क्र. २४ ते २६ वर तसेच ''दै. रत्नागिरी टाईम्स'' मध्ये गुरूवार दि. १७ डिसेंबर २०२० रोजी पान क्र. ९ वर आणि ''दै. किल्ले रायगड'' मध्ये गुरूवार दिनांक १७ डिसेंबर २०२० रोजी पान क्र. २ वर प्रसिद्ध झाली आहे. सदर अधिसूचनेबाबतचे शुद्धीपत्रक क्र. उविअ/कात–२/भूसंपादन/अलिबाग/शुद्धीपत्रक/ एसआर८२/२०२०/२०२१, दि. १७ मार्च २०२१ अन्वये कलम ११ चे अधिसूचनेबाबत शुद्धीपत्रक मराठीमध्ये **महाराष्ट्र शासन राजपत्र,** भाग एक–कोकण विभागीय पुरवणी, दि. २५–३१, मार्च २०२१, पृष्ठ क्र. ९ वर प्रसिद्ध झाली आहे. तसेच ''दै. रायगड वृत्तवेध''मध्ये शनिवार, दिनांक १० एप्रिल २०२१, रोजी पान क्र. ४ वर आणि ''दै. आपले साम्राज्य''मध्ये शुक्रवार दिनांक ०९ एप्रिल २०२१, रोजी पान क्र. ८ वर प्रसिद्ध झाली आहे. यासोबत जोडलेल्या अनुसूची एकमध्ये अधिक तपशीलवार वर्णन केलेल्या जमिनीची, अनुसूची–दोनमध्ये अधिक तपशीलवार विनिर्दिष्ट केलेल्या सार्वजनिक प्रयोजनासाठी आवश्यकता आहे किंवा तिची आवश्यकता भासण्याची शक्यता आहे;

त्याअर्थी, मी, जिल्हाधिकारी रायगड–अलिबाग, भूमिसंपादन, पुनर्वसन व पुनर्वसाहत करताना उचित भरपाई मिळण्याचा व पारदर्शकतेचा हक्क अधिनियम, २०१३ (२०१३ चा ३०) (यात यापुढे ज्याचा निर्देश ''उक्त अधिनियम'' असा केला आहे) हा राज्यात प्रयुक्त असताना त्याच्या कलम १५ च्या पोट–कलम (२) अन्वये अहवाल पाठविलेल्या प्राधिकाऱ्याचा अहवाल विचारात घेतल्यानंतर उक्त सार्वजनिक प्रयोजनासाठी उक्त जमीन संपादित करण्याची आवश्यकता आहे याबाबत माझी खात्री पटली आहे; आणि म्हणून, उक्त अधिनियमाच्या कलम १९ च्या पोट–कलम (१) च्या तरतुदींन्वये, उक्त सार्वजनिक प्रयोजनासाठी उक्त जमिनीची आवश्यकता आहे असे याद्वारे घोषित करण्यात येत आहे;

आणि ज्याअर्थी, अनुसूची–तीन मध्ये अधिक तपशीलवार वर्णन केलेले क्षेत्र हे बाधित कुटुंबियाच्या पुनर्वसन व पुनर्वसाहतीच्या प्रयोजनासाठी ''पुनर्वसाहत क्षेत्र'' म्हणून **''निरंक''** निर्धारित केले असल्याचे याद्वारे घोषित केले जात असून, पुनर्वसन व पुनर्वसाहत योजनेचा सारांश अनुसूची–चारमध्ये **''निरंक''** विनिर्दिष्ट केला आहे;

आणि ज्याअर्थी, उक्त जमीन उक्त सार्वजनिक प्रयोजनासाठी उक्त जमिनीची आवश्यकता आहे. उक्त जमिनीच्या संबंधात यापुढे करावयाच्या सर्व कार्यवाहीच्या बाबतीत जिल्हाधिकाऱ्यांची कार्य पार पाडण्याकरीता संपादन अधिनियमाचे कलम ३ च्या खंड (छ) याद्वारे उपविभागीय अधिकारी, अलिबाग, उपविभाग अलिबाग, ता. अलिबाग, जि. रायगड यांची नेमणूक करण्यात येत आहे. त्याप्रमाणे त्यांना उक्त जमिनीच्या संबंधातील संपादनाची कार्यवाही या प्रयोजनासाठी आवश्यक त्या सर्व व्यवस्था करून सुरू करावी, असे निर्देश देण्यात येत आहे.

**अनुसूची- एक**

(संपादित करावयाच्या जमिनीचे वर्णन)

मौजे अलिबाग, ता. अलिबाग, जिल्हा रायगड

| अ.क्र. | स.नं./हि.नं./गट नंबर | मालमत्ता पत्रक/ सिटएस. क्र. | संपादित क्षेत्र (हे.आर.) |
|---|---|---|---|
| १ | स.नं. १०१/२ | १३५५ | ०–०३–० |
| | | **एकूण क्षेत्र** | **०–०३–०** |

**अनुसूची- दोन**

सार्वजनिक प्रयोजनाच्या स्वरूपाबाबत विवरण

प्रकल्पाचे नाव : मौजे अलिबाग, ता. अलिबाग येथील जमीन रायगड जिल्हा पोलीस दलातील नव्याने स्थापन झालेल्या जलद प्रतिसाद पथक, दंगा नियंत्रण पथक, पोलीस मोटारवाहन इत्यादी प्रयोजनाकरिता संपादन.

प्रकल्पाच्या कामाचे वर्णन : रायगड जिल्हा पोलीस दलातील नव्याने स्थापन झालेल्या जलद प्रतिसाद पथक, दंगा नियंत्रण पथक, पोलीस मोटारवाहन इत्यादी प्रयोजनासाठी संपादन करण्यात येणारी जमीन जिल्हाधिकारी कार्यालयाजवळ असून पोलीस मुख्यालयाच्या परिसरात प्रस्तावित भूसंपादनाच्या जमिनीशेजारी तळकर नगर येथे १०० ते १२५ घरांची वस्ती आहे. दंगलरोधक पथकाच्या कवायती व सरावाकरिता निवडलेली जागा पोलीस मुख्यालयाला लागून असल्याने सोयीची आहे. तसेच सध्याच्या कवायती क्रीडा मैदानाला लागूनच आहे. या ठिकाणी पोलीस नियमित सराव करतात व याची परिसरातील नागरीकांना माहिती आहे व सवय आहे.

समाजाला होणारे लाभ : अलिबाग शहराचे औद्योगिक महत्त्व, वाढते नागरीकरण व पर्यटन वाढते महत्त्व लक्षात घेता, येत्या दशकात अलिबाग शहराचा विकास आणि विस्तार वेगाने होईल. वाढत्या शहरीकरणाच्या प्रक्रियेत ग्रामीण ते शहरी स्थलांतर तर होतेच, परंतु परप्रांतीय स्थलांतरसुद्धा वेगाने होत आहे. याचा नागरी सुविधांवर खूप ताण येतो, रोजच्या जगण्यासाठी संघर्ष वाढतो व गुन्हेगारी प्रवृत्ती वाढते. गुन्हेगारांना पकडणे, शिक्षा करणे व गुन्हेगारी वृत्तीला प्रतिबंध करणे या सर्व आघाड्यांवर पोलीस यंत्रणेला काम करावे लागते. समाजात कायदा व सुव्यवस्था राखण्यात पोलीस दलाची भूमिका व कर्तव्य महत्त्वाचे ठरते. या दृष्टीने स्थानिक पोलीस दलाकडे दंगलरोधक पथक व शीघ्रकृतीदल असणे आवश्यक आहे. यामुळे लोकांना सुरक्षित व आश्वासक वाटते. या पथकाचा नियमित सराव पोलीस मुख्यालयाच्या परिसरात होतो. आजुबाजूच्या वस्तीमधील ९० टक्के लोकांना दंगलरोधक पथक व शीघ्रकृतिदलामुळे सुरक्षित वाटते.

लोकांच्या मते १. सुरक्षिततेची भावना २. भुरटे चोर, साखळीचोर यांना दहशत ३. गुन्हेगारी कमी होईल. ४. लहान मुले, स्त्रिया, ज्येष्ठ नागरिकांना सुरक्षित वाटेल. गुन्हेगारीला प्रतिबंध करण्यासाठी, लोकांच्या मनात विश्वास, सुरक्षिततेची भावना निर्माण करण्यासाठी दंगलरोधक पथक व शीघ्रकृतीदलाची महत्त्वाची भूमिका आहे.

**अनुसूची- तीन**

पुनर्वसाहत क्षेत्राचे वर्णन

गावचे नाव मौजे अलिबाग, तालुका अलिबाग, जिल्हा रायगड

| अनुक्रमांक | भूमापन क्रमांक किंवा गट नंबर | क्षेत्र (हेक्टरमध्ये) |
|---|---|---|
| | निरंक | |

**अनुसूची- चार**

(पुनर्वसन व पुनर्वसाहत योजनेचा सारांश)

''निरंक''

**टीप** : उक्त जमिनीच्या नकाशाचे. उपविभागीय अधिकारी, अलिबाग, उपविभाग अलिबाग, ता. अलिबाग, जि. रायगड या कार्यालयात निरीक्षणाकरिता उपलब्ध होऊ शकेल.

**ठिकाण : अलिबाग**
**दिनांक १७ नोव्हेंबर २०२१**

**क्र.जिमाका/राअ/जाहि/१६९/२०२१–२२**

**सही/–**
**डॉ. महेंद्र कल्याणकर,**
जिल्हाधिकारी, रायगड.

# इंग्लंडला दुहेरी धक्का

## सामना गमावल्यानंतर आता आयसीसीची कारवाई



**ब्रिस्बेन : वृत्तसंस्था**

ॲशेस मालिकेतील पहिल्या कसोटी सामन्यात ऑस्ट्रेलियाने इंग्लंडचा नऊ गडी राखून पराभव केला. या पराभवामुळे दुखावलेल्या इंग्लंडला आणखी एक धक्का बसला आहे. सामन्यातील स्लो ओव्हर रेटसाठी इंग्लंड संघाची संपूर्ण मॅच फी कापण्यात आली. यासोबतच त्यांना आयसीसी (आंतरराष्ट्रीय क्रिकेट परिषद) वर्ल्ड टेस्ट चॅम्पियनशिपचे पाच गुणही गमवावे लागले.

आयसीसीने जारी केलेल्या निवेदनानुसार, एमिरेट्स आयसीसी एलिट पॅनेलचे सामनाधिकारी डेव्हिड बून यांनी निर्धारित वेळेत पाच षटके कमी टाकल्याच्या आरोपावरून हा निर्णय दिला. आयसीसी आचारसंहितेच्या अनुच्छेद २.२२ (किमान ओव्हर रेटबाबत)मध्ये दिलेल्या वेळेत एक षटक पूर्ण करण्यात अयशस्वी झाल्यास खेळाडू आणि सहाय्यक संघ सदस्यांसाठी सामन्याच्या २० टक्के दंड आकारला जातो.

यासोबतच ऑस्ट्रेलियन फलंदाज ट्रॅव्हिस हेडला आयसीसीच्या आचारसंहितेच्या लेव्हल-१ भंगासाठी मॅच फीच्या १५ टक्के दंड ठोठावण्यात आला आहे. बेन स्टोक्सला हेडने अपशब्द वापरले होते.



# आशिया ओशेनिया ज्युदो स्पर्धेत भारताला चार रौप्य, आठ कांस्यपदके

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

लेबनॉन येथे झालेल्या आशिया ओशेनिया ज्युदो स्पर्धेत भारतीय संघाने चार रौप्य व आठ कांस्यपदके पटकावून दमदार कामगिरी केली. स्पर्धा कॅडेट व ज्युनिअर या दोन वयोगटात खेळली गेली. यात भारताचा ३१ सदस्य असलेला संघ सहभागी झाला होता.

स्पर्धेत उझबेकिस्तान संघाने कॅडेट गटात संघाने नऊ सुवर्णपदके मिळवून, तर ज्युनिअर गटात सात सुवर्णपदके मिळवून सांघिक विजेतेपद पटकाविले. कझाकिस्तान संघाने कॅडेट गटात व ज्युनिअर गटात प्रत्येकी तीन सुवर्णपदके जिंकून उपविजेतेपद मिळवले.

**गटनिहाय भारतीय विजेते**

कॅडेट गट-तंनू मानला रौप्यपदक, तनिष्ठा टोकस, लिंथोई, नंदिनी वत्स, अनुराग सागर, शीतल सिंग व अनिल यांना कांस्यपदक

ज्युनिअर गट-यश घनगस, लिंथोई व उन्नती शर्माला रौप्यपदक, रेबिना व इशरूपला कांस्यपदक. सर्वांचे अभिनंदन होत आहे.

## आरोग्य प्रहर

# 'हे'पदार्थ खाऊन शरीरातील लोहाची कमतरता करा दूर

शरीराला आतून बळकट ठेवण्यासाठी आणि सर्व प्रकारांच्या आजारांशी लढण्यासाठी शरीराला लोह तत्त्वाची गरज असते. जर का आपल्या शरीरामध्ये लोहाची कमतरता असेल, तर आपल्याला थकवा आणि धाप लागण्यासारखे त्रास सुरू होऊ शकतात. चला तर आज आपण शरीरातील लोहाची कमतरता कशा प्रकारे दूर करता येईल हे जाणून घेऊया.



लोहाची कमतरता असल्याची लक्षणे : थकवा येणे, सरत्या वयात चपळता कमी होणे स्वाभाविक असले, तरी आपण थोडंसे काम केलं तरी थकवा जाणवत असल्यास आरयनची कमी असल्याचे संकेत आहे. हिमोग्लोबिन कमी असल्यास चेहरा फिकट आणि पिवळट दिसतो. पायऱ्या चढताना किंवा दैनंदिन काम करताना आपल्याला धाप लागत असल्यास लोहाची कमतरता असू शकते.

शरीरामधील लोहाची कमतरता दूर करण्यासाठी...

* गूळ व शेंगदाणे खाल्ल्याने आपल्या शरीरातील रक्ताची कमतरता दूर होईल. आपण नियमाने देखील खाऊ शकता.
* अंकुरलेले कडधान्य घेतल्याने शरीरातील हिमोग्लोबिनची कमतरता दूर होईल, हे आपण दररोज सकाळी घेऊ शकता.
* डाळिंबात लोह चांगल्या प्रमाणात असते. एक ग्लास कोमट दुधामध्ये दोन चमचे डाळिंबाचे चूर्ण टाकून प्यायल्याने रक्ताची कमतरता दूर होते.
* बिटाचे नियमाने सेवन केल्याने आपण आपल्या शरीरातील लोहच्या कमतरतेला दूर करू शकता. बीटरूटला आपण सॅलड रूपात किंवा रस किंवा सूप बनवूनदेखील पिऊ शकता.
* ओट्स आपल्या शरीर आणि आरोग्यासाठी खूप फायदेशीर असतो. ह्याचे सेवन केल्याने आपण लोहाची कमतरता दूर करू शकता.
* आपल्या आहारामध्ये फळांचा पण समावेश करावा. ह्याचबरोबर नियमितपणाने ड्रायफ्रुट्स सेवन करावे. आपण आपल्या दिवसाची सुरुवात बदाम घेण्यापासून देखील करू शकता. बदाम रात्रभर भिजत घालून सकाळी दुधाबरोबर घेणे आपल्या आरोग्यासाठी फायदेशीर आहे.
* आपल्या आहारात व्हिटॅमिन सी समाविष्ट करावे. यासाठी आपण लिंबाचे सेवन करू शकता. यामुळे शरीरात हिमोग्लोबिनचे प्रमाण वाढते. आपण सकाळच्या वेळी लिंबू पाणी घेण्यास सुरू करू शकता. त्याचबरोबर सॅलडवर लिंबाचा रस टाकून खाल्ल्याने आपल्या आरोग्यासाठी फायदेशीर ठरेल.

## विजय हजारे करंडक क्रिकेट स्पर्धा

# कर्नाटकची मुंबईवर मात

**तिरुवनंतपुरम : वृत्तसंस्था**

सलामीवीर रवीकुमार समर्थच्या (१२९ चेंडूंत नाबाद ९६) उत्कृष्ट फलंदाजीच्या जोरावर कर्नाटकने विजय हजारे करंडक एकदिवसीय क्रिकेट स्पर्धेत शनिवारी मुंबईला सात गडी आणि २७ चेंडू राखून शह दिला. गतविजेत्या मुंबईचा हा तीन सामन्यांत दुसरा पराभव ठरला.

**संक्षिप्त धावफलक**

मुंबई : ५० षटकांत ९ बाद २०८ (यशस्वी जैस्वाल ६१, हार्दिक तामोरे नाबाद ४६; प्रवीण दुबे ४/२९) पराभूत वि. कर्नाटक : ४५.३ षटकांत ३ बाद २११ (रवीकुमार समर्थ नाबाद ९६; प्रशांत सोळंकी २/४८).

एलिट ब-गटात मुंबईचा कर्णधार शाम्स मुलानीने नाणेफेक जिंकून प्रथम फलंदाजी स्वीकारली. यशस्वी जैस्वाल (६१) आणि अरमान जाफर (४३) या युवकांनी ९५ धावांची सलामी दिली, परंतु अरमानला जगदिश सुचितने, तर यशस्वीला समर्थने बाद केले. यानंतर हार्दिक तामोरे (नाबाद ४६) आणि धवल कुलकर्णी (१०) यांचा अपवाद वगळता एकाही मुंबईकर फलंदाजाला दुहेरी धावसंख्या गाठता आली नाही. त्यामुळे मुंबईला ५० षटकांत ९ बाद २०८ धावांचीच मजल मारता आली.

कर्नाटकने २०९ धावांचे लक्ष्य ४५.३ षटकांत गाठले. समर्थ आणि रोहन कदम (४४) यांनी चांगली सुरुवात केली. मग समर्थला करूण नायरची (नाबाद ३९) उत्तम साथ लाभली.

# ऋतुराजच्या शतकानंतरही महाराष्ट्र संघ पराभूत

**राजकोट : वृत्तसंस्था**

कर्णधार ऋतुराज गायकवाडने साकारलेले सलग तिसरे शतक व्यर्थ ठरले. विजय हजारे करंडक क्रिकेट स्पर्धेच्या ड-गटात शनिवारी महाराष्ट्राचा केरळने चार गडी राखून पराभव केला.

नाणेफेक गमावल्यानंतर प्रथम फलंदाजी करणाऱ्या महाराष्ट्राचे दोन फलंदाज २२ धावांत तंबूत परतले, परंतु सलामीवीर ऋतुराजने १२९ चेंडूंत नऊ चौकार आणि तीन षटकारांसह १२४ धावांची खेळी साकारून धावसंख्येला आकार दिला. ऋतुराज आणि उपकर्णधार राहुल त्रिपाठी (९९) यांनी तिसऱ्या गड्यासाठी १९५ धावांची भागीदारी केली. त्यामुळेच महाराष्ट्राला ८ बाद २९१ अशी आव्हानात्मक धावसंख्या उभारता आली.

प्रत्युत्तरात केरळची १०.३ षटकांत चार बाद ३५ अशी केविलवाणी अवस्था झाली, परंतु विष्णू विनोदने ८२ चेंडूंत आठ चौकार आणि दोन षटकारांनिशी नाबाद १०० धावा करीत संघाच्या विजयात सिंहाचा वाटा उचलला. सिजोमन जोसेफने नाबाद ७१ धावा करीत त्याला तोलामोलाची साथ दिली. विनोद आणि सिजोमन जोडीने सातव्या गड्यासाठी १७४ धावांची नाबाद भागीदारी केली.

# पेझारीत कबड्डी स्पर्धा

**अलिबाग : प्रतिनिधी**

अलिबाग तालुक्यातील पेझारी येथे भैरवनाथ युवक मंडळ व रायगड जिल्हा कबड्डी असोसिएशनच्या संयुक्त विद्यमाने रायगड जिल्हा किशोर व किशोरी गट कबड्डी स्पर्धा आयोजित करण्यात आली आहे.

स्पर्धेच्या उद्घाटनास रायगड जिल्हा कबड्डी असोसिएशनचे खजिनदार प्रमोद ठाकूर, उपाध्यक्ष हिराचंद पाटील, सूर्यकांत ठाकूर, गजानन मोकल, जगदिश पाटील, सुनंदा गावंड, कार्याध्यक्ष संदेश बैकर, उपकार्याध्यक्ष जगदिश पाटील, सहकार्यवाह जे. जे. पाटील, प्रमोद म्हात्रे, संजय मोकल, जनार्दन पाटील, लक्ष्मण गावंड, नरेश पाटील, रमेश पाटील, पांडुरंग पाटील, प्रसिद्धी समितीचे सचिव हिरामण भोईर, सरपंच प्राजक्ता म्हात्रे, भैरवनाथ मंडळाचे अध्यक्ष विजय पाटील, तसेच अजित भगत, मनोज धुमाळ, रमाकांत पाटील, मोरा म्हात्रे, अशोक पाटील, कमलाकर म्हात्रे, दिलीप म्हात्रे, मोहन म्हात्रे, महेश पाटील आदी उपस्थित होते.

# शिवाजीनगर प्रीमियर लीग

**उलवे नोड : आदेश स्पोर्ट्स आयोजित शिवाजीनगर प्रीमियर लीग २०२१चे उद्घाटन रविवारी पनवेल महापालिकेचे सभागृह नेते परेश ठाकूर यांच्या हस्ते करण्यात आले. या स्पर्धेला माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी भेट दिली. या वेळी पंचायत समिती सदस्य रत्नप्रभा घरत, न्हावे ग्रामपंचायतीचे सरपंच हरिश्चंद्र म्हात्रे, गव्हाण ग्रामपंचायतीचे उपसरपंच विजय घरत, शिवाजीनगर अध्यक्ष धनाजी ठाकूर, किशोर ठाकूर, शिरीष कडू, पी. के. ठाकूर, गजानन ठाकूर, पंढरीनाथ ठाकूर, विजय ठाकूर उपस्थित होते. मान्यवरांनी खेळाडूंना प्रोत्साहित केले.**










## अभिनंदन!



**पनवेल : तालुक्यातील दुंदरे येथील साहिल हनुमान सिनारे याने हैदराबादमध्ये झालेल्या आशियाई थाई बॉक्सिंग स्पर्धेत सुवर्णपदक पटकाविले. याबद्दल माजी उपसरपंच रमेश पाटील, राजेश भोपी, रवींद्र पाटील, नामदेव जमदाडे, गुरूनाथ भोपी, शांताराम चौधरी, नितीन काठावळे यांनी अभिनंदन केले.**

## उद्घाटन



**उलवे नोड : गव्हाण कोपर येथील निखील ठाकूर यांच्या से. १७मधील शुभ रियल इस्टेट या कार्यालयाचे उद्घाटन भाजप तालुका अध्यक्ष अरुणशेठ भगत यांच्या हस्ते रविवारी करण्यात आले.**






दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीतील सेवा, उत्पादने अथवा त्यासंदर्भातील कोणत्याही दाव्यांची वा उपयोगाची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहर घेणार नाही. दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची खातरजमा व शहानिशा वाचकांनीच करून संबंधितांशी व्यवहार करावेत. त्यासंदर्भात प्रसिद्ध झालेल्या दाव्यांच्या पूर्ततेची, तसेच कोणत्याही मजकुराची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहरचे मुद्रक, प्रकाशक, संपादक वा मुख्य संपादक यांच्यावर राहणार नाही, याची दैनिक राम प्रहरच्या वाचकांनी आणि जाहिरातदारांनी नोंद घ्यावी. -मुख्य संपादक

हे पत्र मालक मल्हार नेटवर्क प्रा. लि. करिता मुद्रक, प्रकाशक कृष्णा चांगू ठाकूर यांनी सिद्धकला प्रिंट मीडिया ॲण्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., डब्ल्यू २३० टीटीसी इंडस्ट्रियल एरिया, एमआयडीसी, ठाणे-बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई ४०० ७१० येथे छापून अस्पायर प्राईड, गाळा नं. ४, रुपाली चौक, पनवेल. ४१० २०६. रायगड येथून प्रकाशित केले. RNI Regn. No. MAH MAR/2008/26534, **मुख्य संपादक : देवदास मटाले.** पोस्टल परवाना क्र. एनएमबी/१२०/२०२०-२२. कार्यालय संपर्क : दूरध्वनी ०२२-२७४८०१००, २७४९०१०० e-mail : ramprahar@gmail.com